# एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात चार टक्के वाढ

**मुंबई** : गणेशोत्सवाच्या तोंडावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची



बातमी दिली आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३४ टक्क्यांवरुन ३८ टक्के करण्याच्या प्रस्तावावर शुक्रवारी (दि. ८) मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतनासाठी शासनाकडून अर्थसहाय देण्यात येते. त्यामुळे महागाई भत्त्यामध्ये चार टक्क्यांची वाढ झाल्याने सरकारवर नऊ कोटी रुपयांचा बोजा पडेल. त्याचप्रमाणे असुधारित वेतन संरचनेतील राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना २१२ टक्के महागाई भत्ता देण्यात येईल. या निर्णयाचा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सुमारे ९० हजार अधिकारी-कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ५४
www.ramprahar.com

शनिवार, ९ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

एअरहोस्टेसची हत्या करणाऱ्या आरोपीची आत्महत्या/२
सावरोली-खारपाडा मार्गावर उपाययोजनांची मागणी/५
'अमेरिकन ओपन'मध्ये बोपन्नाने रचला इतिहास/८

# आजपासून जी-२० परिषद; राजधानी दिल्ली सज्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीत ९ व १० सप्टेंबरला जी-२० परिषद होत असून त्यासाठी व्यवस्था पूर्ण झाली आहे. या परिषदेसाठी जगभरातील दिग्गज नेत्यांचे आगमन झाले आहे.

जी-२० म्हणजे २० सदस्य देशांचा समूह, ज्यामध्ये जगातील २० सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांचा समावेश आहे. यात अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, दक्षिण कोरिया, जपान, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स हे १९ देश असून २०वा युरोपियन युनियन आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थिरता, हवामान बदल कमी करणे आणि शाश्वत विकास यासारख्या जागतिक अर्थव्यवस्थेशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी हे देश एकत्र येतात.

जी-२० परिषदेसाठी दिल्लीत प्रगती मैदानावर खास भारत मंडपम उभारण्यात आला आहे. या वेळी आलेल्या परदेशी पाहुण्यांना भारत आपले हायटेक तंत्रज्ञानही



दाखवेल. यासाठी भारत मंडपममध्ये डिजिटल इंडिया एक्सपिरियन्स झोन तयार करण्यात आला आहे, जिथे परदेशी पाहुण्यांना भारतातील अनेक नवीन गोष्टी जाणून घेण्याची संधी मिळेल. विशेष एआय चॅटबॉटही आहे, जो भगवद्गीतेवर आधारित प्रश्नांची उत्तरे देईल.

## जागतिक बँकेकडून कौतुक

जी-२० परिषदेपूर्वी जागतिक बँकेने भारताचे जबरदस्त कौतुक केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने केवळ सहा वर्षांतच आर्थिक समावेशाचे लक्ष्य गाठले, जे अत्यंत कौतुकास्पद आहे. जर हे सामान्य गतीने चालले असते, तर याला किमान ४७ वर्षे लागली असती, असे जागतिक बँकेने आपल्या अहवालात म्हटले आहे. एवढेच नाही, तर भारताने हे यश आपल्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बळावर संपादन केल्याचेही जागतिक बँकेने या अहवालात म्हटले आहे. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या एक्स अकाउंटवर म्हटले आहे की, हे आमच्या मजबूत डिजिटल पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चरचे आणि आमच्या लोकांच्या इच्छाशक्तीचे कौतुक आहे तसेच हे आमच्या वेगवान विकासाचे आणि नवनिर्माणाचे प्रमाण आहे.

# रायगडात दमदार पाऊस

**अलिबाग, पोलादपूर : प्रतिनिधी**

हवामान खात्याने जाहीर केलेल्या अंदाजानुसार रायगड जिल्ह्यासह कोकणात शुक्रवारी (दि. ८) जोरदार पाऊस पडला. यामुळे सकाळी कामानिमित्त घराबाहेर पडलेला कामगारवर्ग आणि शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह पालकांची तारांबळ उडाली, परंतु या पावसाने हवेत गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे, तर भातशेतीला संजीवनी मिळाली आहे.

दरम्यान, पोलादपूर-महाबळेश्वर-वाई-सुरूर राज्यमार्गावरील आंबेनळी घाटामध्ये गुरुवारपासून पावसाने जोर धरल्यानंतर शुक्रवारी सकाळी पुन्हा दरडी कोसळायला सुरुवात झाली असून या वेळी घाटामाथ्यावरील झाडेदेखील दरडीसोबत रस्त्यावर आल्याचे दिसून आले.

गोपाळकाल्याचा मुहूर्त साधत गुरुवारीच वरुणराजाने हजेरी लावली होती. सकाळपासूनच पावसाच्या किरकोळ ते मध्यम सरी बरसत होत्या. त्यामुळे दहीहंडीसाठी सज्ज असलेल्या गोविंदांच्या उत्साहाला उधाण आले. दिवसभर पावसाची संततधार सुरू होती. सायंकाळी त्याचा जोर काहीसा ओसरला, पण दुसऱ्या दिवशी शुक्रवारी या पावसाचा जोर वाढला.

पावसाच्या पुनरागमनामुळे शेतकऱ्यांसह सर्वांनाच दिलासा मिळाला आहे, कारण पावसाअभावी खरीपातील पिके करपून जाण्याची भीती होती, तर उकाड्यामुळे समस्त नागरिक त्रस्त झाले होते. पावसाच्या येण्याने सारेच सुखावले आहेत.

दरम्यान, कोकण विभागात शुक्रवारी सकाळपर्यंत झालेल्या चोवीस तासांत सरासरी ५३.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद ठाणे जिल्ह्यात ९७.१ मिमी झाली आहे. त्याखालोखाल पालघर ७५.५ मिमी, रायगड ४५.३ मिमी, रत्नागिरी ४६.१ मिमी, सिंधुदुर्ग २४.८ मिमी अशी पावसाची आकडेवारी आहे, तर कोकण विभागात आतापर्यंत एकूण २५९२.८ मिमी पाऊस पडला आहे.

आंबेनळी घाटातील दरडी हटविण्याचे काम तातडीने पूर्ण झाले असून घाटमाथ्यावरून कोसळलेल्या झाडांनाही जेसीबीद्वारे रस्त्यावरून हटवून रस्ता मोकळा करण्यात आला असल्याची माहिती तहसिलदार कपिल घोरपडे यांनी दिली.

### आंबेनळी घाटात दरड कोसळली



(छाया : शैलेश पालकर)

### यलो अलर्ट जारी

पुढील काही दिवस रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहणार आहे. रायगड जिल्ह्यात पुढील पाच दिवसांसाठी प्रादेशिक हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागाने नदी किनाऱ्यावरील तसेच डोंगर उतारावरील गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# भाजप उत्तर रायगड जिल्हा अंतर्गत पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मान्यतेने उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांची घोषणा केली आहे.

यामध्ये जिल्हा सरचिटणीस, उपाध्यक्ष, चिटणीस, कोषाध्यक्ष, विविध मोर्चांचे जिल्हाध्यक्ष, आघाड्यांचे जिल्हा संयोजक तसेच नऊ मंडलांचे अध्यक्ष यांचा समावेश आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

भाजप उत्तर रायगड सरचिटणीसपदी दीपक बेहेरे, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, चारूशीला घरत; उपाध्यक्षपदी वसंत भोईर, जयंत पगडे, रामदास ठोंबरे, निळकंठ घरत, विठ्ठल मोरे, सुधीर ठोंबरे, डॉ. कविता चौतमोल, प्रिया मुकादम, सुभाष कदम, सनी यादव; चिटणीसपदी चंद्रकांत घरत, ज्ञानेश्वर घरत, रमेश मुंडे, ब्रिजेश पटेल, मंगेश म्हसकर, सायली म्हात्रे, रत्नप्रभा घरत, विद्या तामखेडे, किर्ती नवघरे, प्रदीप देशमुख; तर कोषाध्यक्षपदी अभिलाषा ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महिला मोर्चा जिल्हाध्यक्षपदी अश्विनी पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी मयुरेश नेतकर, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्षपदी अमित जाधव, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी राजेश गायकर, अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्षपदी मन्सूर पटेल आणि आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी बंडू शिद यांची नियुक्ती झाली आहे.

कामगार आघाडी संयोजकपदी जितेंद्र घरत, फ्रेंडस् ऑफ बीजेपी नितीन कांदळगावकर, जैन प्रकोष्ट अशोक ओसवाल, आध्यात्मिक समन्वय आघाडी काशिनाथ पारठे, सहकार सेल अशोक मोटे, सोशल मीडिया सेल संयोजक गायत्री परांजपे, आयटी सेल नितेश सोळंकी, भटके-विमुक्त आघाडी संयोजक बबन बारगजे, सांस्कृतिक सेल संयोजक अभिषेक पटवर्धन, ट्रान्सपोर्ट सेल सुधीर घरत, प्रज्ञा सेल गीता चौधरी, **(पान २ वर..)**

## निवडक

### आधार कार्ड मोफत अपडेट करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ

**मुंबई** : आधार कार्डमध्ये नाव, पत्ता, जन्मतारीख, लिंग, मोबाइल नंबर, ई-मेल आयडी यांसारखे कोणतेही बदल अपडेट करायचे असतील, तर ते १४ डिसेंबरपर्यंत विनामूल्य करता येतील. यापूर्वी यासाठी अंतिम तारीख १४ सप्टेंबर होती. ही मुदत पुन्हा एकदा वाढविण्यात आली आहे. आधार कार्ड अपडेटसाठी मोफत सेवा फक्त ऑनलाईन उपलब्ध आहे.

### फोन टॅपिंगप्रकरणी रश्मी शुक्ला यांना दिलासा; दोन्ही गुन्हे रद्द

**मुंबई** : फोन टॅपिंगप्रकरणी आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाकडून शुक्ला यांच्याविरुद्ध नोंदवलेले दोन्ही गुन्हे (एक मुंबईतील व दुसरा पुण्यातील) रद्द करण्यात आले आहेत.

# इर्शाळवाडीतील बेपत्ता व्यक्तींच्या वारसांना सोमवारपासून मदतवाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

इर्शाळवाडी येथील बेपत्ता ५७ जणांच्या वारसांना मदत वाटपाचे काम येत्या सोमवार (दि. ११)पासून सुरू होणार आहे. राज्य सरकारने बेपत्ता व्यक्तींना मृत समजून वारसांना मदत वाटप करण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या वतीने मदत वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.



खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे १९ जुलै रोजी दरड कोसळली होती. यात इर्शाळवाडीतील ४० घरे दरडीखाली गाडली जाऊन २७ जणांचा मृत्यू झाला होता, तर ५७ जण बेपत्ता होते, पण दरड दुर्घटनेतील मृतदेहांचे विघटन सुरू झाल्याने चौथ्या दिवशी मदत व बचावकार्य थांबविण्यात आले.

या दुर्घटनेनंतर राज्य सरकारने मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार दुर्घटनेतील २७ मृतांच्या वारसांना यापूर्वीच मदत वाटप करण्यात आली, पण जे ५७ बेपत्ता होते त्यांच्या वारसांना अद्यापही मदत मिळू शकली नव्हती. त्यामुळे दरड दुर्घटनेतील बेपत्ता व्यक्तींना मृत घोषित करून मदत करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविला होता. त्यास सरकारने मंजुरी दिली आहे.

जिल्हा प्रशासनाकडून सोमवारपासून ५७ बेपत्ता व्यक्तींच्या वारसांना मदत वाटपाचे काम सुरू होणार आहे, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत देण्यात आली.

विधानसभा निवडणूक शपथपत्र

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोषमुक्त

**नागपूर : प्रतिनिधी**



२०१४च्या विधानसभा निवडणूक प्रतिज्ञापत्रात दोन गुन्ह्यांची नोंद नसल्याच्या प्रकरणात माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोषमुक्त झाले आहेत. निवडणुकीवर परिणाम होईल असे हे गुन्हे नव्हते तसेच त्यांनी कुठल्या हेतूने हे गुन्हे लपवले हे सिद्ध होत नसल्याने प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी एस. एस. जाधव यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना दोषमुक्त करण्यात येत असल्याचा निकाल दिला.

तक्रारदार ॲड. सतीश उके यांनी या प्रकरणात याचिका दाखल केली होती. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर या प्रकरणाचा निकाल ५ सप्टेंबर रोजी सुनावला जाणार होता, परंतु न्यायालयाने निकालाची तारीख ही ८ सप्टेंबर निश्चित केली. अखेर नागपूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयातील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दोषमुक्त केले. या सुनावणीसाठी उपमुख्यमंत्री ऑनलाईन पद्धतीने न्यायालयीन कामकाजात सहभागी झाले होते.

## पनवेलच्या आरोग्य महाशिबिराबाबत

# आज नियोजन आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी म्हणून पनवेल तालुका व शहरातील गरीब व गरजू जनतेसाठी मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार महाशिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्या संदर्भातील नियोजन आढावा बैठक शनिवारी (दि. ९) सायंकाळी ६.३० वाजता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



या महाशिबिरात आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला तसेच औषधोपचार मोफत केले जातात. याचा १५ हजारहून अधिक नागरिक लाभ घेत असतात. त्यामुळे सर्व रुग्णांना योग्य सेवा देण्यासाठी नियोजनात कोणतीही कमतरता राहू नये यासाठी या नियोजन आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात ही बैठक होणार असून समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले आहे.

# शिवरायांची वाघनखे भारतात आणणार

■ सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढण्यासाठी वापरलेली वाघनखे आणि महाराजांची जगदंबा तलवार ब्रिटनमध्ये आहेत. राज्य सरकार ही तलवार आणि वाघनखे मायभूमीत परत आणण्याचा प्रयत्न करीत असून या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे दिसत आहे. ब्रिटनने वाघनखे परत करण्यास तयारी दर्शवली असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना दिली.

ब्रिटनने वाघनखे भारताला परत करण्यास मान्यता दिली आहे. ही वाघनखे सध्या अल्बर्ट म्युझिअममध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली आहे. ती परत मिळावीत यासाठी आपण इंग्लंडला जाणार आहोत. या वेळी व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझिअमसह सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली जाणार आहे, असे मंत्री मुनगंटीवार यांनी सांगितले.

ना. मुनगंटीवार पुढे म्हणाले की, जर सर्व काही ठरल्याप्रमाणे झाले तर वाघनखे या वर्षीच पुन्हा महाराष्ट्रात परत येतील. आम्हाला युके प्रशासनाकडून छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे परत करण्यास तयार असल्याचे पत्र मिळाले आहे. हिंदू कॅलेंडरप्रमाणे ज्या दिवशी महाराजांनी अफजलखानाचा वध केला होता, त्या दिवशीच ही वाघनखे परत आणली जातील. याशिवाय इतर तारखांचाही विचार केला जात आहे तसेच वाघनखे भारतात परत कशी आणायची यावरही चर्चा सुरू आहे.

### जगदंबा तलवारीसाठीही प्रयत्न

छत्रपती शिवरायांची वाघनखे मिळण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्याव्यतिरिक्त आम्ही इतर गोष्टींचीही चाचपणी करीत आहोत. महाराजांची जगदंबा तलवारही परत मिळावी यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान वाघनखे परत येत आहेत हे महाराष्ट्रासाठी फार मोठे यश आहे, असेही सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मनुगंटीवार यांनी म्हटले आहे.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता दहावीचा विद्यार्थी पार्थ उमाकांत पाटील याने ओडिशातील भुवनेश्वर येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय थाई बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत रौप्यपदक जिंकले असून त्याची ऑक्टोबरमध्ये हैदराबाद येथे होणाऱ्या वर्ल्ड थाई बॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. याबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पार्थचे अभिनंदन केले व त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी संस्थेचे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, पीटी शिक्षक हितेश कडू व पालक उमाकांत पाटील उपस्थित होते.**

# चंद्रकांत कांबळे यांची हत्या घर विकण्याच्या वादातून

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तिसे रेल्वे फाटकावरील गेटमन चंद्रकांत कांबळे यांची २१ ऑगस्ट रोजी अज्ञात इसमाने गोळी झाडून हत्या केली होती. घर विक्रीच्या वादातून विजय रमेश शेट्टी याने ही हत्या केल्याचे पोलीस तपासातून उघड झाले आहे. आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

मयत चंद्रकांत कांबळे यांची बहीण विमल शेट्टी व तिचा पती विजय शेट्टी या दोघांच्या नावे असलेले खैरवाडी येथील घर विजयला विकायचे होते. त्यामुळे दोघांमध्ये प्रचंड वाद निर्माण झाला असता पोलिसांनी विजयच्या घराची तपासणी करून मिळालेल्या पुराव्यानुसार मयत चंद्रकांत कांबळेंची हत्या विजयने केल्याचे निष्पन्न झाले आहे. विजयवर याआधीही गुन्हे दाखल आहेत.

# मध्य रेल्वेच्या शून्य भंगार मोहिमेला गती

## भंगार विक्रीतून १५०.८१ कोटी रुपयांची तिजोरीत भर

**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचा प्रत्येक विभाग, कारखान्यातील भंगार साहित्य हटविण्यासाठी शून्य भंगार मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत एप्रिल–ऑगस्ट २०२३ या कालावधीत भंगार विक्रीतून १५०.८१ कोटी रुपये महसूल जमा झाला आहे.



मध्य रेल्वेने कालबाह्य इंजिन, डिझेलवर धावणारे इंजिन, रेल्वे रूळ, जुने किंवा अपघातात नुकसान झालेले इंजिन, डबे यांसह विविध प्रकारच्या भंगाराची विल्हेवाट लावण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. मध्य रेल्वेने १ एप्रिलपासून ३१ ऑगस्टपर्यंत १५०.८१ कोटी रुपयांची भंगाराची विक्री केली आहे. या मोहिमेअंतर्गत माटुंगा आगारातील २७.१२ कोटी रुपयांच्या भंगाराची विक्री करण्यात आली.

मुंबई विभागातील २५.९७ कोटी रुपये, भुसावळ विभागातील २२.२५ कोटी रुपये, पुणे विभागातील १६.०८ कोटी रुपये, भुसावळच्या विद्युत इंजिन आगारातील १६.०५ कोटी रुपये, सोलापूर विभागातील ११.३६ कोटी रुपये, नागपूर विभागातील १०.०७ कोटी रुपये, मध्य रेल्वेवरील इतर ठिकाणच्या विभागांतील एकत्रित २१.९१ कोटींच्या भंगाराची विक्री करण्यात आली.

रेल्वे बोर्डाचे २०२३–२४ वर्षात ३०० कोटी रुपयांच्या भंगाराची विक्री करण्याचे उद्दिष्ट्य निश्चित केले आहे. ऑगस्ट २०२३पर्यंत ३७.१० टक्क्यांनी भंगार विक्रीत वाढ झाली आहे, असे मध्य रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले. नको असलेले ६,०८६ मेट्रिक टन रूळ, नऊ लोकोमोटिव्ह, १६० डबे आणि ६१ वाघिणी (वॅगन्स) यांची भंगारात विक्री करण्यात आली.

# पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय कॉरिडॉरवरील बोगद्याचे काम सुरू


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई रेल्वे विकास महामंडळ च्या मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट ३ अंतर्गत पनवेल–कर्जत रेल्वे प्रकल्प आकार घेत आहे. पनवेल–कर्जत नवीन उपनगरीय कॉरिडॉरवरील वावर्ले बोगद्याच्या २६२५ मीटरपैकी १००० मीटर भूमिगत खोदकाम ६ सप्टेंबर २०२३ रोजी पूर्ण झाला आहे हा बोगदा पूर्ण झाल्यावर मुंबई उपनगरीय नेटवर्कमधील हा सर्वात लांब बोगदा असेल.

या मार्गावर एकूण ३,१४४ मीटर लांबीचे ३ बोगदे) नियोजित केले आहेत.यामध्ये मुख्य बोगदा–१: २१९ मीटर लांबीचा (नधळ बोगदा), मुख्य बोगदा–२ ची लांबी २,६२५ मीटर (वावरेली बोगदा), बोगदा–३: ३०० मीटर लांबीचा किरावली बोगदा आहेत.

या प्रकल्पाचा एक भाग म्हणून हे तीनही बांधकाम सुरू आहेत. यामध्ये बोगदा–१ (नधळ बोगदा) चे २१.१०.२०२२ रोजी काम सुरू झाले आणि १०.५.२०२३ रोजी यश मिळाले. सध्या वॉटर प्रूफिंग आणि कॉंक्रीट अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. पनवेल–कर्जत एकेरी रेल्वे मार्गावर सध्याच्या बोगद्याच्या जवळ असणे हे या बोगद्यावरील उत्खननाच्या कामाच्या अंमलबजावणीतील सर्वात मोठे आव्हान होते, ज्यासाठी हे काम अधिक कठोर सुरक्षा निर्बंधांखाली करणे आवश्यक आहे. बोगदा–२

वावरेली बोगदा हा पनवेल–कर्जत उपनगरीय प्रकल्पातील सर्वांत लांब २,६२५ मीटर लांबी असलेल्या मुख्य बोगदा– २(वावरेली बोगदा) बोगद्याच्या पी १ आणि पी २ या दोन्ही प्रवेशाच्या



ठिकाणी २२–फेब्रुवारी २०२३ रोजी सुरूवातीला स्फोट करून कामाला सुरुवात करण्यात आली. या बोगद्याचे भूमिगत उत्खनन ६.९.२०२३ रोजी १००२ मीटरपर्यंत पूर्ण झाले आहे. बोगद्याला प्रामुख्याने रॉक बोल्टिंग, वायरमेश आणि शॉटक्रीटचा आधार आहे आणि त्याला कायमस्वरूपी जलरोधक कॉंक्रीट अस्तर प्रदान केले जाईल.

जागेवर पुरेसा प्रकाश, वेंटिलेशन आणि डिवॉटरिंग व्यवस्थेच्या तरतुदीसह प्रस्तावित पनवेल–कर्जत उपनगरीय कॉरिडॉरच्या बोगद्याच्या साइट्सचे काम सुरळीतपणे सुरू आहे, अशी माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली आहे.

**विविध सुविधा असणार**

या बोगद्यांमधील ट्रॅक संरचना बॅलास्ट लेस ट्रॅकवर असेल. या बोगदयाचे काम समकालीन आंतरराष्ट्रीय मानकांच्या बरोबरीने पुरेसे सार्वजनिक आश्रय क्षेत्र, बोगदा नियंत्रण प्रणाली, प्रकाश व्यवस्था आणि वायुवीजन प्रणाली तयार केली जात आहेत.

## ग्रामविकास विभागाच्या भरतीप्रक्रियेसंदर्भात आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

ग्रामविकास विभागाची संपूर्ण भरतीप्रक्रिया शासनाने मान्यता दिलेल्या आय.बी.पी.एस. या कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे परीक्षा अत्यंत पारदर्शक व काटेकोर पद्धतीने होणार आहे. तथापि, काही समाजविघातक प्रवृत्तींच्या व्यक्तींकडून प्रलोभने दाखवून आर्थिक फसवणूक करण्याची शक्यता नाकारता येत नाही. उमेदवारांनीकोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, असे आवाहन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.

मंत्री महाजन म्हणाले की, ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत राज्यातील ३४ जिल्हा परिषदांतर्गत गट – क मधील ३० संवर्गातील एकूण १९ हजार ४६० इतकी रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबतची जाहिरात ५ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. जाहिरातीनुसार ५ ते २५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन पद्धतीने उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी सांगितले आहे की, कोणतीही व्यक्ती परिक्षेसंदर्भात आर्थिक मागणी करीत असल्याबाबत निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुद्ध जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात यावी, फसवणूक झाल्यास शासन अथवा जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

# गणेशोत्सवात पनवेल महानगरपालिका मध्यवर्ती समन्वयक म्हणून काम पाहणार

**पनवेल : प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेश उत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच गणेशोत्सव व्यवस्थितरीत्या संपन्न होण्याकरिता संवाद व नियोजन करण्याच्या हेतूने गणेशोत्सवात महापालिका मध्यवर्ती समन्वयक म्हणून काम पाहणार आहे



आयुक्त गणेश देशमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी (दि. ८) बैठक घेण्यात आली. या वेळी उपायुक्त गणेश शेटे यांनी पनवेल महापालिकेच्या वतीने गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांना ऑनलाईन पध्दतीने परवाना देण्यात येणाऱ्या सुविधेचे माहितीसह प्रात्यक्षिक सादर केले. तसेच यावर्षी पनवेल महापालिका पर्यावरणपूरक गणेशोत्सवावरती भर देत आहे. यासाठी महापालिकेने तयार केलेल्या लघूपटाचे सादरीकरण करण्यात आले.

या वेळी पोलीस विभागाचे उपायूक्त पंकज डहाणे अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त अभिषेक पराडकर, सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक रजपूत, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल बोंडे तसेच महापालिका अधिकारी, सिडको, विद्युत वितरण, तहसिल, गणेश मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने येणाऱ्या विविध विषयांवरती यावेळी चर्चा करण्यात आली. पनवेल महानगरपालिका गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांना ऑनलाईन पध्दतीने परवानगी देणार आहे. यासाठी https://smartpmc.co.in/ ही वेबसाईट तयार केली असुन, गणेश मंडळांनी या वेबसाईटवर जाऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# जोरदार पावसाने जनजीवन विस्कळीत

**चौक : प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टीच्या दिवशी सुरू झालेला पाऊस वाढत गेल्याने जनजीवन विस्कळीत होऊ लागले आहे. बाजारपेठा शांत व शासकीय कार्यालयातदेखील वर्दळ कमी दिसत आहे.

अनेक दिवसांची विश्रांती घेतल्या नंतर बुधवारी सायंकाळी पावसाने भगवान श्रीकृष्ण यांच्या स्वागताला हजेरी लावली. बुधवारी रात्री सुरू झालेला पाऊस काल दिवसभर दमछाक करीत वाढत गेला. गुरुवारी रात्री उशीरा सुरू झालेला तुफान पावसाने आता जनजीवन विस्कळित करण्यास सुरुवात केली.

कलोते धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ४० मिमी, भिलवले धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ४५ मिमी तर डोणवत धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ८० मिमी. पावसाची नोंद दुपार पर्यंत झाली आहे. कलोते धरणातून पाण्याचा विसर्ग ९.०४ क्यूसेस सुरु आहे. भिलवले धरणातून पाण्याचा २६.१० क्यूसेस विसर्ग सुरु आहे. डोणवत धरणाच्या पाण्याचा १.९६ क्यूसेस विसर्ग सुरू आहे.

खालापूर तालुक्यात तुर्तास कोणतीच आपत्ती जनक परिस्थिती नाही, प्रशासन आपत्ती निवारण करण्यास सक्षम असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दिली.


## निवडक

### ट्रकची रिक्षाला धडक; तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** ट्रकने रिक्षाला दिलेल्या धडकेत रिक्षेतील उमेश आत्माराम पाटील (राहणार वलप) याचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी ट्रक क्रमांक एम एच ४६ ए आर ४३६७ वरील चालक याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ट्रक (एमएच ४६ एआर ४३६७) चालकाची रिक्षा (एमएच ४६ बिडी १०२२) चालक उमेश आत्माराम पाटील हा आय जी–पीएल ते नावडे ब्रिजकडे जाणाऱ्या तळोजा एमआयडीसी रोडवर, एस एस पाटील कन्स्ट्रक्शन यांच्या ऑफिसच्या उत्तर बाजूस धडक बसली. या अपघातात उमेश पाटील यांच्या डोक्याला गंभीर दुखापती झाल्या व त्यात त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर ट्रकचालक वैद्यकीय मदत न देता पळून गेला आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात ट्रकचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पनवेल तालुक्यात डोळ्यांची साथ

**पनवेल :** सध्या पनवेल तालुक्यात डोळ्यांची साथ पसरली आहे. जवळपास ४० ते ५० जणांना सध्या डोळ्यांची साथ आलेली आहे. त्यामुळे काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पनवेल तालुक्यात नेरे, वावंजे, गव्हाण, अजिवली, आपटा या पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आजमीतीस जवळपास २०० जणांना डोळ्याची साथ पसरली आहे. यापैकी १५६ रुग्ण बरे झाले तर ४० ते ४५ शिल्लक रुग्ण आहेत. त्यामुळे नागरिकांनी वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे. डोळ्यांची साथ पसरल्यास नागरिकांनी घराच्या बाहेर पडू नये, कारण इतरांचे डोळे येण्याची शक्यता असते. शाळेतील विद्यार्थ्यांचेदेखील डोळे आलेले आहेत.



पान १ वरन

## भाजप उत्तर रायगड जिल्हा अंतर्गत पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

आयुष्यमान भारत सेल ज्योती देशमाने, बेटी बचाव बेटी पढाव आरती तायडे, व्यापार आघाडी संयोजक कमल कोठारी, मच्छीमार सेल प्रदीप नाखवा, दक्षिण भारतीय सेल संयोजक श्रीनिवास कोडूरू, उत्तर भारतीय सेल संयोजक संतोष शर्मा, वैद्यकीय सेल संयोजक डॉ. संतोष आगलावे, एनजीओ संपर्क आघाडी मंदार मेहेंदळे, शिक्षक सेल के.सी.पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ता सेल सी.सी.भगत, दिव्यांग सेल विलास फडके, कायदा सेल राजेंद्र अग्रवाल, क्रीडा प्रकोष्ट विनोद नाईक, रेल्वे प्रवासी प्रकोष्ट उपेंद्र मराठे, उद्योग आघाडी सुरेश खानावकर आणि पदवीधर प्रकोष्टपदी राजेश कदम यांची नियुक्ती झाली आहे.

याशिवाय कर्जत मंडल अध्यक्षपदी राजेश भगत, खोपोली रमेश रेटरेकर, खालापूर प्रवीण मोरे, उरण रवी भोईर, पनवेल ग्रामीण अरुणशेठ भगत, पनवेल शहर अनिल भगत, कामोठे रवींद्र जोशी, कळंबोली रविनाथ पाटील, खारघर मंडल अध्यक्षपदी प्रवीण पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.

# पनवेलच्या लक्ष्मी-नारायण मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव

**पनवेल : प्रतिनिधी**

सेलिब्रेटीचे डान्स, लाखो रुपयांच्या उंच हंड्या, आणि नेत्यांची गर्दी म्हणजे आजचा दहीहंडी उत्सव अशा ग्लॅमरसच्या जमान्यात पनवेलच्या पुरातन लक्ष्मी – नारायण मंदिरात १०२ वर्षाची परंपरा जपून श्रीकृष्ण जन्मोत्सव पारंपारिक पध्दतीने शाडूच्या मूर्तिची प्रतिष्ठापना करून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.




वैशाली कुलकर्णी, गौरी राजे, नीलिमा वैद्य, कविता चित्रे, स्मिता चित्रे, अश्विनी देशमुख, वंदना लिखिते, श्वेता कर्णिक, स्नेहा दिघे, प्रतिभा हाजरनिस, रोहिणी देशपांडे व मिलिंद देशपांडे यांनी भजन व पाळणा म्हटला त्यानंतर सुंठवडा आणि आणलेला प्रसाद उपस्थितांना वाटण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष योगेश राजे, सचिव गिरीश गडकरी, सहसचिव संदीप देशमुख, खजिनदार श्रीकृष्ण चित्रे, महेश कर्णीक, अनिल गडकरी, श्रीनिवास कुळकर्णी, क्रांतीकुमार कुळकर्णी, राहुल देशपांडे, योगेश शृंगारपुरे,शैलेश शृंगारपुरे, आशिष चौबळ, तुषार देशपांडे, याशिका राजे, योगेश शृंगारपुरे, सानिका पत्की व महिला मंडळाने विशेष मेहनत घेतली.

## उरण भाजपतर्फे आज सागरा प्राण तळमळला नाटक

**उरण : वार्ताहर**



भारतीय जनता पक्ष उरण यांचा वतीने हिंदूतेजसूर्य स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित नाटक श्री बालाजी निर्मित मधुसूदन कालेलकर लिखित सागरा प्राण तळमळला नाटक शनिवारी (दि. ९) सायंकाळी ६.३० वाजता जेएनपीटी मल्टी पर्पज हॉल, उरण येथे आयोजित करण्यात आले आहे. विनामुल्य प्रवेश आहे.

स्वागतोत्सुक उरण विधानसभा आमदार महेश बालदी आहेत. दिग्दर्शक कुमार सोहोनी, नेपथ्य संदेश बेंद्रे, संगीत नंदलाल रेळे, सूत्रधार महेश मांजरेकर असून कलाकार अंगद म्हसकर, सुनील गोडसे, सुरभी भावे, संध्या म्हात्रे, वरदा साळुंखे, दुर्वेश आरेकर, रोहित मावळे, शार्दुल आपटे, केदार जोशी, निनाद शेट्ये, आकाश भडसावळे, नंदू जुवेकर आदी कलाकार आहेत.

# एअरहोस्टेसची हत्या करणाऱ्या आरोपीची तुरुंगात आत्महत्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या मरोळ भागातील एका आलिशान इमारतीत राहणाऱ्या २५ वर्षीय एअरहोस्टेसची रविवारी सफाई कर्मचारी विक्रम सिंह अटवालने धारदार सुऱ्याने हत्या केली होती. या प्रकरणी विक्रमला अटक करण्यात आल्यानंतर आता त्याने तुरुंगात गळफास घेऊन स्वतःचेही आयुष्य संपवले आहे.

ट्रेनी एअरहोस्टेस रुपल ओग्रे ही तरुणी घरात मृतावस्थेत आढळली होती. मुळची छत्तीसगडची असलेली रुपल एप्रिल २०२३मध्ये नोकरीच्या निमित्ताने मुंबईत आली होती. आरोपी विक्रम तिच्यावर बलात्कार करण्याच्या निमित्ताने घरात शिरला होता. त्या वेळी झालेल्या झटापटीमध्ये त्याने तरुणीच्या गळ्यावर सुऱ्याने वार केला आणि त्यातच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी विक्रमला अटक केली होती. त्यानंतर आरोपी विक्रमने आता तुरुंगातील शौचालयात पँटच्या मदतीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या प्रकरणी गुन्हे शाखा अधिक तपास करीत आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीनमालक **श्री. अमित शंकर नाईक** यांच्या मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील **मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड** येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे –

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट क्र. व उपविभाग क्र. | लागवडी योग्य क्षेत्र हे. आर. प्रति |
|---|---|---|
| बेलोंडाखार | ३२/१ | ०–०९–६०<br>पो. ख. ०–००–८०<br>**०–१०–४०** |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि मुळ जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्बेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, भेट अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हितसंबध, दावा असेल तर त्यांच्या पृष्टयार्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतींबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या आत** सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासनू मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अषिल हे सदरहु जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

**सही/–**
**धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)

पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८



# हाळ खुर्द येथील उर्दू शाळेसाठी आमदार महेंद्र थोरवेंचा पुढाकार



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील १९०५ साली बांधण्यात आलेली राजिप उर्दू शाळा, हाळखुर्द ही १०० वर्षांपेक्षा जुनी झालेली शाळा पुनर्बांधणीच्या प्रतीक्षेत असल्याचे समजल्यानंतर याची दखल आमदार महेंद्र थोरवे यांनी तत्काळ घेतली. या शाळेच्या पुनर्विकास आणि सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सरकार कटिबद्ध असल्याची भावना याठिकाणी भेट देताना व्यक्त केली.

१०० वर्षांपासून अधिक काळानंतरही पुनर्बांधणीच्या प्रतीक्षेत असल्याचे निवेदन आमदार महेंद्र थोरवे यांच्यापर्यंत पोहचताच शाळेची मागणी सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले. हाळ खुर्द ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आलेल्या मागणीनुसार, अंदाजे १२ गुंठ्यांत नवीन बांधकाम करून आधुनिक अशी सर्व सोयी सुविधायुक्त असलेली शाळा उभारणीसाठी शक्य ते सर्व प्रयत्न करू, असे आश्वासन आमदार महेंद्र थोरवे यांनी जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या पाहणी दौऱ्यादरम्यान दिले.

या पाहणी दौऱ्याला शिवसेना नेते विजय पाटील, संजय नाना देशमुख, सरपंच शबनम मुल्ला, उपसरपंच अजीम मांडलेकर, सदस्य कासिम बेडेकर, कमली वाघमारे, असिफ बेडेकर, प्रभास क्षीरसागर, शालेय व्यवस्थापन समिती ग्रामस्थ मंगेश क्षीरसागर ग्रामस्थ उपस्थित होते.

## दुखवटा

### दीपक नाईक



**उरण :** येथे १९९७ साली स्थापन झालेल्या युद्ध नौका विक्रांत सेवाभावी क्रिडा मंडळ चिरनेरचे संस्थापक सचिव दीपक नाईक यांचे वयाच्या ५०व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ आहे. दीपक नाईक हे पेणमधील हमरापूर येथील रहिवासी असतानादेखील त्यांचे चिरनेर येथे क्रिडा मंडळ स्थापन करण्यात महत्त्वाचे योगदान होते. कै. दीपक नाईक यांच्यावर हमरापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले असून दहावा गुरुवारी (दि.१४) दादर खाडी येथे, तर दिवस कार्य रविवारी (दि. १७) राहत्या घरी होणार आहेत.

### पंढरीनाथ नाईक



**नवी मुंबई :** श्री गणेश व्यायाम शाळेचे संस्थापक अध्यक्ष व स्वयंभू श्री गणेश मंदिर, शिरवणे ट्रस्टचे अध्यक्ष पंढरीनाथ आत्माराम नाईक यांचे गुरुवारी (दि. ७) पहाटे आकस्मिक निधन झाले. शिरवणे येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सांप्रदायिक वारकरी पंथाचा पगडा पंढरीनाथ आत्माराम नाईक यांच्यावर होता. शिरवणे येथील तरुणांना व्यायामाची आवड निर्माण व्हावी, यासाठी सुमारे ४० वर्षापूर्वी शिरवणे गावात व्यायामशाळा स्थापन केली. आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यात हिरीरीने सहभाग घेणारे पंढरीनाथ नाईक नवी मुंबई महापौर जयवंत सुतार यांचे मार्गदर्शक होते.

# पनवेल परिसरात दहीहंडी उत्साहात

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली ठिकठिकाणी भेट



खारघर : भाजप खारघर मंडल व शिव प्रतिष्ठान सामाजिक संस्था बेलपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहीहंडी कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, हरेश केणी, रामजी बेरा, गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, भाजप शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, संतोष शर्मा, अजय माळी, राजेंद्र मांजरेकर, संदीप रेड्डी, गजे सिंग, समीर कदम, किरण पाटील, शैलेंद्र त्रिपाठी, वासुदेव पाटील, भरत कोंडाळकर, दिलीप जाधव, अनिल खोपडे, अनिल साबणे, नितेश पाटील, विजय बागडे, विनोद ठाकूर, साधना पवार, डॉ. विजय उजळंबे, आंबालाल पटेल, अंकिता वारंग, निर्मला यादव, कल्पना मोरे, लखवीरसिंग सैनी, संजय घरत आदी उपस्थित होते.



पनवेल : भाजप युवा मोर्चा नावडे शहर अध्यक्ष जितेंद्र काटकर यांच्या वतीने आयोजित दहीहंडी कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, सचिन पाटील, नवदीप पाटील, रवींद्र खानावकर, महेश पाटील अभिनेत्री प्रतिभा शिवणकर, सागर सातपुते, महेश भिंगारकर, सन्नी फडके आदी उपस्थित होते.



कामोठे : मुंबईस्थित पारनेरकरांच्या वतीने कामोठे येथे दहीहंडी उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहर अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्यासह आयोजक भाऊ पावडे, कुंडलिक वाफारे, निलेश आहेर, कृष्णा ढोमे, राहुल आंग्रे आदी उपस्थित होते.



कामोठे : माजी नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या माध्यमातून कामोठे गावात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये माजी नगरसेवक दिलीप पाटील आणि विजय चिपळेकर यांच्या वतीने बालगोपाळांना १०० टी-शर्टचे वाटप करण्यात आले.



खारघर : श्री कच्छ कडवा पाटीदार समाज खारघर आयोजित जन्माष्टमी कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी सदीच्छा भेट दिली व सर्वांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. कच्छ कडवा पाटीदार समाज खारघरचे अध्यक्ष कांतिभाई पटेल, कच्छ कडवा पाटीदार युवक मंडळाचे अध्यक्ष अल्पेश पटेल व खजिनदार हरेश पटेल यांनी मान्यवरांचे स्वागत केले.



कामोठे : प्रदीप भगत युवा मंचच्या वतीने आयोजित दहीहंडी कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, भाजप कार्यकर्ते प्रदीप भगत, हॅप्पी सिंग आदी उपस्थित होते.



पनवेल : भाजप कार्यकर्ते राजू पारंगे यांच्या घरी जन्माष्टमीनिमित्त आयोजित पूजेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी सोबत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उमेश इनामदार आदी उपस्थित होते. सर्वांचे स्वागत करण्यात आले.



खारघर : इस्कॉन मंदिरात भव्य गोकुळाष्टमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी तेथे भेट दिली. त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, मंदिराचे अध्यक्ष सूरदास प्रभु उपस्थित होते. इस्कॉन मंदिरातील गोकुळाष्टमी कार्यक्रमादरम्यान ठिकठिकाणचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



खांदा कॉलनी : भाजप नेते भिमराव पोवार वाढदिवसानिमित्त आयोजित दहीहंडी उत्सवात त्यांचे अभीष्टचिंतन करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, चिटणीस गणेश पवार, कामगार नेते मोतीराम कोळी, चंद्रकांत सोनावणे, राजू शहापूरकर, विवेक बाजी, सचिन सावंत, सचिन नागटिळक, राहुल पोवार, राजश्री पोवार आदी उपस्थित होते. सेक्टर ७चा राजा गोविंदा पथकाने ही हंडी फोडली.

# गव्हाण विद्यालयात मोफत हेल्मेटवाटप

## रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील सेवा सहयोग फाऊंडेशन व आयसीआयसीआय लोम्बार्ड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी व पालकांना मोफत शिरस्राणे अर्थात हेल्मेटचे वितरण करण्यात आले.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांनी अध्यक्ष भाषणात रस्ते सुरक्षितचे महत्व त्याचप्रमाणे विद्यार्थी आणि पालक दोघांनाही शिरस्त्रान सक्ती करणे आवश्यक असल्याचे सांगून वेगावर नियंत्रण ठेवणे आणि शिरस्त्रान वापरणे ह्या दोन्ही गोष्टी अपघात टाळू शकतात याची माहिती देऊन अपघातग्रस्त तरुणांचा भार आपल्य म्हातारपणापर्यंत पालकांना सांभाळावा लागतो अशा काही उदाहरणांसह विद्यार्थी व पालकांचे प्रबोधन केले.

या कार्यक्रमास गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत व स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपप्राचार्य प्रमोद मंडले, यत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय रवींद्र भोईर व प्रमोद कोळी, सेवा सहयोग फौंडेशनचे च्या असिस्टंट मॅनेजर सुषमा शिंदे, समन्वयक राजेश शेट्टी, जयश्री सानप, लक्ष्मी माळी तसेच या उपक्रमाचे समन्वयक विद्यालयाचे गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, कलाशिक्षक गणेश भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे,सागर रंधवे, शितलकुमार म्हात्रे आदी मान्यवर, शिक्षक, त्याचप्रमाणे विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

सेवा सहयोग फाऊंडेशनचे च्या असिस्टंट मॅनेजर सुषमा शिंदे यांनी प्रास्ताविकामध्ये सेवा सहयोग फाऊंडेशनच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन आपण विद्यार्थी व शाळा तसेच शिक्षणाप्रती कर्तव्य तत्पर असल्याचा निर्वाळा दिला. फाउंडेशनचे समन्वयक राजेश शेट्टी यांनी देखील रस्ते सुरक्षा याविषयी प्रोजेक्टरच्या सहाय्याने विस्ताराने माहिती सांगितली. या वेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आणि आरएसपी समन्वयक देवेंद्र म्हात्रे यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.

## भाजपतर्फे मंगळागौर स्पर्धा

**उरण : वार्ताहर**

भाजप महिला मोर्चा उरण यांच्या वतीने मंगळागौर स्पर्धा २०२३ रविवारी (दि.१०) टाउनशिप उरण येथे दुपारी २ वाजता आयोजन करण्यात आले आहे. प्रथम पारितोषिक ७७७७ रुपये, द्वितीय पारितोषिक ५५५५ रुपये, तृतीय पारितोषिक ३३३३ रुपये अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

प्रमुख पाहुणे आमदार पनवेल प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी आहेत. कार्यक्रमास महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, केंद्रीय संपर्क प्रमुख महिला मोर्चा संध्या शारबिद्रे, सामजिक कार्यकर्त्या वर्षा ठाकूर, नीता बालदी, महिला मोर्चा उत्तर रायगड उपाध्यक्षा संगीता पाटील, चिटणीस चारुशीला घरत, पनवेल तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, उरण तालुका अध्यक्ष ॲड. राणी म्हात्रे, शहर अध्यक्षा संपूर्णा थळी, उरण माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे आदी उपस्थित राहणार आहेत.

अधिक माहितीसाठी अरुणा घरत (९९२०६२४०१४) व निर्मला घरत (९३७२९६६७५६) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कळंबोली ते पनवेल रेल्वेस्थानक 'एनएमएमटी' चालू करण्याची मागणी

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजप कळंबोली शहराध्यक्ष रवीशेठ पाटील यांच्यासह भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी कळंबोली पोलीस मुख्यालय ते पनवेल रेल्वे स्थानक एनएमएमटीची बस चालू करावी, अशी मागणी परिवहन व्यवस्थापक योगेश कडूसकर यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.



कळंबोली येथून पनवेल रेल्वे स्थानक कडे जाण्यासाठी कोणतीही बस सेवा उपलब्ध नाही त्यामुळे रिक्षावाले भरमसाठ भाडे आकारतात. कळंबोली मध्ये माथाडी कामगार, तसेच नोकरी व कामधंद्यासाठी जाणारा वर्ग व विद्यार्थी यांच्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकाकडे जाण्यासाठी एकही बस सेवा, रेल्वे सेवा किंवा दुसरा कोणताच आधार नाही. पर्यायाने त्यांना रिक्षाने प्रवास करावा लागतो त्यामुळे मोठा भार त्यांच्या खिशावर पडतो. यासाठी यासाठी कळंबोली पोलीस मुख्यालय येथून सेक्टर १४, डी मार्ट, बिमा कॉम्प्लेक्स, कळंबोली सर्कल, खांदा कॉलनी या मार्गे पनवेल रेल्वे स्थानक येथे जाण्यासाठी बस चालू करावी, अशी मागणी कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील यांनी केली आहे.

रविनाथ पाटील यांच्यासोबत भाजपा भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, कळंबोली शहर सरचिटणीस दिलीप बीस्ट, उत्तर भारतीय मोर्चाचे मंडळ संयोजक केशव यादव उपस्थित होते.



**पनवेल : तक्का येथे आशिष नाईक मित्र मंडळाच्या वतीने आयोजित दहीहंडी उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे आदी उपस्थित होते. प्रसिद्ध गायक मुकेश उपाध्याय यांचा लाईव्ह ऑर्केस्ट्राही या वेळी ठेवण्यात आला होता. सहभागी मंडळांना २,२२,२२२ रुपयांची बक्षीसे देण्यात आली.**

## संपादकीय

# मुत्सद्देगिरीचा कस

गेले जवळपास वर्षभर ज्या जी-२० शिखर परिषदेची आपल्याला प्रतिक्षा होती, ती दोन दिवसीय परिषद शनिवारपासून राजधानी नवी दिल्लीमध्ये सुरू होते आहे. इंडोनेशिया येथे १ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीनंतर भारताने जी-२०चे अध्यक्षपद अधिकृतरित्या स्वीकारले. अर्थातच प्रत्येक भारतीयासाठी हे अध्यक्षपद अभिमानास्पद आहे.

**मागच्या वर्षी इंडोनेशियातील बाली येथे नोव्हेंबर महिन्यात जी-२० राष्ट्रगटाची शिखर परिषद झाली होती. जी-२०चे यजमानपद स्वीकारल्यानंतर भारताने 'एक जग, एक कुटुंब, एक भविष्य' असे ब्रीदवाक्य जी-२० परिषदेला दिले. त्याला अनुसरूनच पर्यावरण, जागतिक तापमानवाढ, शाश्वत विकास हे विषय उद्यापासून सुरू होणाऱ्या परिषदेत चर्चिले जाणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बहुस्तरीय विकास बँक आणि जैवइंधनाचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करण्याबाबत जी-२० राष्ट्रगटातील देशांचे एकमत घडवण्याचा प्रयत्नही परिषदेत होईल. अलीकडच्या काळात भारताचा जागतिक स्तरावर चांगलाच दबदबा निर्माण झाला आहे, त्या पार्श्वभूमीवर ही परिषद होते आहे हे महत्त्वाचे आहे. भारत आजच्या घडीला जगातील एक महत्त्वाची आणि सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था गणली जाते. जागतिक स्तरावरील विविध महत्त्वाच्या व्यासपीठांवर भारत आज आपली भूमिका ठामपणाने मांडताना दिसतो. या दशकाच्या अखेरीस भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकाची सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असेल याचा उच्चार अलीकडे अनेकदा झाला आहे. एक नव्याने उदयाला येऊ लागलेली महासत्ता म्हणून भारताकडे जग पाहते आहे. जी-२०चे अध्यक्षपद वर्षभरासाठी आपल्याकडे आल्यानंतर गेल्या वर्षभरात जम्मू-काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि पूर्वेकडील राज्यांपासून पश्चिमी राज्यांपर्यंत जी-२० राष्ट्रगटाकरिता अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन भारताने केले. शनिवारपासून राजधानीत होणाऱ्या परिषदेसाठी या राष्ट्रगटातील बहुतेक सर्व देशांचे प्रमुख नेते शुक्रवारपर्यंत दाखल झाले होते. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे दोन महत्त्वाचे नेते मात्र परिषदेला उपस्थित राहणार नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीबद्दलची कारणे यापूर्वीच बरीच चर्चिली गेली आहेत. युक्रेन युद्धामुळे पुतिन यांनी या शिखर परिषदेत सहभागी होण्याचे टाळले आहे. गेल्या वर्षी इंडोनेशियातील परिषदेच्या अखेरीस संयुक्त घोषणापत्रात रशियाच्या आक्रमक वृत्तीवर टीका करण्यात आली होती. युक्रेन युद्धावरून अमेरिका तसेच पाश्चात्य देश आणि चीन-रशिया यांच्यातील मतभेद तीव्र झाले आहेत. त्यामुळे नवी दिल्लीतील परिषदेच्या अखेरीस संयुक्त घोषणापत्र प्रसिद्ध होईल का याची चर्चा सुरू आहे. संयुक्त राष्ट्रांतील सुरक्षा परिषद व इतर जागतिक व्यासपीठे उपलब्ध असताना जी-२०च्या परिषदेत रशिया-युक्रेन युद्धाबद्दल चर्चा करण्यास रशियाच्या राजदूतांनी विरोध दर्शवला आहे. रशियासाठी अडचणीची ठरेल अशी कोणतीही भूमिका या परिषदेत भारताने घेऊ नये अशीच रशियाची इच्छा आहे, परंतु अमेरिका आणि अमेरिकेचे मित्रपक्ष भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करणार हेही अपेक्षितच आहे. रशियाच्या आक्रमकतेचा उल्लेख घोषणापत्रात नसेल तर जर्मनी त्यावर सही करणार नाही हे जर्मनीने स्पष्ट केले आहे. वास्तवत: हा राष्ट्रगट प्रामुख्याने आर्थिक विषयावरील चर्चेकरिता असल्याने नवी दिल्लीतील परिषदेमध्ये सहमतीने संयुक्त घोषणापत्र तयार करण्यासाठी शेर्पांची अर्थात विविध देशांच्या प्रतिनिधींची धावपळ सुरू आहे. सर्व राष्ट्रप्रमुखांमध्ये ही सहमती न झाल्यास युक्रेनचा उल्लेख वगळून 'दिल्ली घोषणापत्र' जाहीर केले जाण्याची शक्यता आहे. तेही मान्य न झाल्यास परिषद प्रथमच घोषणापत्राविना संपुष्टात येण्याची शक्यता संबंधितांनी व्यक्त केली आहे.**

# राज्य कर विभागाची अभय योजना

**राज्य शासनाने व्यापाऱ्यांच्या जुन्या थकबाकीच्या परतफेडीसाठी मागील वर्षी २०२२ अधिनियम क्र.२९ द्वारा जीएसटी पूर्वीच्या कायद्यासाठी अभय योजना जाहीर केली होती. तिचे सर्व स्तरांतून उस्फुर्त स्वागत झाले, कारण व्यापाऱ्यांसाठी ही योजना उपयुक्त ठरली होती. जीएसटी पूर्व कायद्यांमधील निर्धारणेचे काम आता बहुतांशी संपलेले असले, तरी थकबाकी अजूनही आहे. या पार्श्वभूमीवरच राज्य सरकारने या वर्षी अजून एक अभय योजना जाहीर केली आहे.**

जीएसटीच्या प्रभावी अंमलबजावणी सोबतच व्यापार व उद्योग क्षेत्राच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन ही योजना आणण्यात आली आहे आणि तरतुदीही सोप्या आहेत. या योजनेचे नाव महाराष्ट्र कर व्याज शास्ती किंवा विलंबशुल्क यांच्या थकबाची तडजोड असे आहे. या योजनेंतर्गत आवश्यक रकमेचा भरणा करण्याचा कालावधी दि. १ मे ते दि. ३१ ऑक्टोबर २०२३ असा आहे.

**वैशिष्ट्य :** यावर्षी दोन लाखांपर्यंत थकवाकी पूर्णपणे माफ होणार आहे. ज्या व्यापाऱ्यांची वैधानिक आदेशानुसार थकबाकी ५० लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा व्यापाऱ्यांना अविवादित कर, विवादित कर शास्ती याचा वेगवेगळा हिशेब न करता सरसकट एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरण्याचा पर्यायदेखील उपलब्ध आहे अशी ठोक २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रकमेस माफी देण्यात येईल. या वर्षीच्या अभय योजनेत या सवलतीची व्याप्ती वाढवली आहे. जे व्यापारी अशा प्रकारे ठोक रक्कम भरण्यास पात्र ठरणार नाहीत किंवा हा पर्याय निवडणार नाहीत, अशा व्यापाऱ्यांच्या थकबाकीच्या तडजोडीसाठी योजनेमध्ये अविवादित करास कुठलीही सवलत देण्यात येणार नाही. अविवादित कराचा १०० टक्के भरणा करावा लागेल.

विवादित करापोटी भरायची रक्कम कालावधीनुसार ठरेल म्हणजे ३१ मार्च २००५ पूर्वीच्या कालावधीसाठी ३० टक्के भरणा करावा लागेल, त्याचबरोबर व्याजापोटी १० टक्के व शास्तीपोटी पाच टक्के भरणा करावा लागेल. ३१ मार्च २००५नंतरच्या कालावधीसाठी यात बदल आहेत.

१ एप्रिल २००५ रोजी व त्यानंतर सुरू होणाऱ्या व ३० जून २०१७ रोजी संपणाऱ्या कालावधीकरीता विवादित कराची रक्कम एकरकमी पर्यायात ५० टक्के असेल आणि माफी ५० टक्के असेल तर हप्त्याने प्रदानाचा पर्याय निवडला तर ५६ टक्के भरणा करून ४४ टक्के माफी असेल त्याचप्रमाणे व्याज १५ टक्के भरल्यावर उर्वरित माफी मिळेल आणि शास्ती पाच टक्के भरल्यास उर्वरित माफी मिळेल.

**रकमेचा भरणा :** या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक रकमेचा एकरकमी भरणा विहित कालावधीत करावा लागेल. तो सर्वसाधारणरित्या १ मे ते ३१ ऑक्टोबर २०२३ असा असेल, मात्र ज्या व्यापाऱ्यांची एका आर्थिक वर्षाची थकबाकी ५० लाखांहून जास्त आहे त्यांना अभय योजनेंतर्गत भरावयाच्या आवश्यक रकमेसाठी हप्ते सवलतीचा पर्यायदेखील याही वर्षी उपलब्ध आहे आणि हप्ते भरण्याची मुदत ३१ ऑक्टोबरनंतरही असेल. ही सवलत चार भागात विभागली असेल. हप्ते भरण्यास विलंब झाल्यास १२ टक्के दराने व्याजाची आकारणी होईल.

कमी पैसे भरले म्हणून व्यापाऱ्याचा अर्ज फेटाळण्यात येणार नाही. भरलेल्या रकमेच्या प्रमाणात त्याला माफी नक्की मिळेल. आवश्यक रकमेपेक्षा कमी प्रदान असल्यास त्याचे समायोजन प्रथम अविवादित करापोटी करण्यात येईल. शिल्लक रक्कम विवादित कर, व्याज शास्ती व विलंबशुल्कापोटी करावयाच्या आवश्यक रकमेच्या प्रदानाच्या प्रमाणात समायोजित करण्यात येईल व त्या अनुषंगाने माफीची सवलत अनुज्ञेय राहील.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे या थकबाकीसाठी कलम ३२ किंवा ३२ क अन्वये नोटीस देण्यात आलेली असली किंवा नसली तरी या थकबाकीसाठी अर्ज करता येईल.

**अभय योजनेमुळे मिळणाऱ्या तडजोडीसाठीची पात्रता :** अर्जदार संबंधित अधिनियमान्वये नोंदणी केलेला असो किंवा नसो. संबंधित कालावधीच्या बाबतीत कर व्याज शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीच्या बाबतीत अपिल केलेले असो किंवा नसो, अर्ज करण्यास पात्र असले. या अर्जदाराने कोणत्याही शासन निर्णयाद्वारे किंवा २०१६, २०१९, २०२२च्या अभय योजनेखाली लाभ घेतला असेल असा अर्जदार देखील या योजनेचा लाभ घ्यायला पात्र असेल, मात्र यात एकच अपवाद आहे. अर्जदार २०२२अंतर्गत लाभ घेतला असेल किंवा घेत असेल त्याला ज्या थकबाकीकरिता तडजोड अधिनियम २०२२अंतर्गत यापूर्वीच अर्ज केला असेल आणि जिथे आवश्यक रक्कम भरण्याचा देय दिनांक अद्याप उलटून गेलेला नसेल अशा थकबाकीसाठी या अधिनियमाखाली त्याला लाभ घेता येणार नाही, मात्र २०२२ अंतर्गत देय लाभ किंवा त्याशिवाय पारित केलेल्या तडजोडीच्या आदेशांच्या प्रकरणात वरील बाब लागू होणार नाही.

वस्तू व सेवाकर विभागाने महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणामध्ये किंवा न्यायालयांमध्ये संदर्भ किंवा अपील दाखल केलेले असेल त्याबाबतीत कर व्याज शास्ती किंवा विलंब शुल्क यांसह उक्त विभागाच्या विवादित मागण्या अर्जदाराकडून थकबाकीच्या तडजोडीसाठी विचारात घेण्यात येतील आणि त्यानुसार तडजोडीसाठी अर्ज सादर करता येईल. अशा प्रकरणामध्ये उक्त विभागाने एकदा का या अधिनियमान्वये विवादित रकमेची तडजोड केली असेल त्यानंतर या अधिनियमान्वये अशा प्रकारे प्रदान केलेली रक्कम परत करण्यात येणार नाही किंवा समायोजित केली जाणार नाही किंवा अगोदरच माफ केलेल्या रकमेची वसुली करण्यात येणार नाही. जर या योजनेसाठी अर्ज करावयाचा असेल तर अपिली प्राधिकाऱ्यांसमोर किंवा न्यायाधिकरणासमोर किंवा न्यायालयासमोर प्रलंबित असलेले अपील, अर्जदार पूर्णपणे आणि विनाशर्त मागे घेईल. ही तरतूद २०२२च्या अभय योजनेप्रमाणे आहे.

जर मूल्यवर्धित कर अधिनियमाखालील अधिकची वजावट किंवा परतावा, केंद्रीय विक्रीकर अधिनियम १९५६ किंवा प्रवेशावरील कर अधिनियम या खालील दायित्वापोटी समायोजित केली असेल किंवा अशा प्रकारे समायोजित केलेली वजावट किंवा परतावा कमी करण्यात किंवा नाकारण्यात आला असेल तर केंद्रीय विक्रीकर अधिनियम १९५६ किंवा प्रवेशावरील कर अधिनियम या खालील अपीलासोबत मूल्यवर्धित कर अधिनियमान्वये दाखल केलेले अपील देखील पूर्णपणे आणि विनाशर्त मागे घेणे गरजेचे आहे. तडजोडीच्या अर्जासोबत अपील मागे घेण्याच्या अर्जाची पोचपावती सादर करणे हा उक्त अपील मागे घेण्याबाबतचा पुरेसा पुरावा असल्याचे समजण्यात येईल.

**अर्ज प्रक्रिया :** अर्जदार कलम १० पोट कलम २मध्ये दिलेल्या तक्त्यातील खंड (क) मध्ये नमूद केलेल्या शेवटच्या दिनांकास दिलेल्या थकबाकीच्या प्रत्येक वित्तीय वर्षांसाठी स्वतंत्रपणे अर्ज करेल, मात्र एखाद्या वित्तीय वर्षाशी संबंधित असणाऱ्या एकापेक्षा अधिक विवरणांच्या किंवा सुधारित विवरणांच्या बाबतीतील विवरणानुसार असलेल्या देण्यांची तडजोड करण्याची इच्छा असेल तर तो एकच अर्ज करू शकेल.

जर अर्ज अधिनियमाच्या तरतुदीनुसार नसेल तर अर्जदाराला आपले म्हणणे दिल्यानंतर लेखी आदेशाद्वारे अर्ज फेटाळण्यात येईल.

जर अर्जदाराने कोणतीही महत्त्वाची माहिती दडवून ठेवून किंवा चुकीची किंवा खोटी माहिती सादर करून तडजोडीचा लाभ मिळवला असल्याचे दिसून आले असेल वा झडती आणि जप्ती या कार्यवाहीत महत्त्वाची तथ्ये दडवून ठेवलेली किंवा तपशील लपवून ठेवला असल्याचे आढळून आले तर त्याबाबतीत कारणे लेखी नमूद करून व अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ज्या वित्तीय वर्षात तडजोडीचा आदेश बजावण्यात आला असेल, त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून दोन वर्षाच्या कालावधीत कलम १३च्या पोट कलम १ अन्वये काढलेला उक्त आदेश रद्द करता येईल.

जर तडजोडीचा आदेश रद्द करण्यात आला तर तडजोडीच्या आदेशात समाविष्ट असलेले निर्धारणा पुनर्निर्धारणा, दुरुस्ती, पुनरीक्षण, पुनर्विलोकन हे ताबडतोब पुनरुज्जीवित किंवा पुनःस्थापित होईल, मात्र जर त्याची कालमर्यादा रद्द केल्याच्या आदेशाच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत समाप्त झाली असेल, तर अशा आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत याबाबत कार्यवाही करण्यात येईल. याबाबतीत मूळ अपिल संबंधित अपिल प्राधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यावर पुनःस्थापित करण्यात येईल

जीएसटीपूर्व विक्रीकर विभागाने राबवलेले सर्व कर यात समाविष्ट आहेत. थकबाकीचे शक्य ते सर्व प्रकार अंतर्भूत आहेत. बीएसटी ते एमव्हीएटी सर्व कर यात अंतर्भूत असल्याने २०१७पर्यंतचे सर्व कालावधी यात घेतले आहेत. दोन लाखांपर्यंत थकबाकीची प्रकरणे निर्लेखित करणे, थकबाकी ५० लाखांहून जास्त असली तरी हप्ते सवलतीचा पर्याय, या नवीन तरतुदीमुळे ही योजना अधिक उदारमतवादी ठरली आहे. या योजनेचा लाभ घेऊन जुन्या कायद्यातील थकबाकीतून व्यापाऱ्यांनी मुक्त व्हावे आणि आताच्या उद्योग व्यवसायावर लक्ष एकाग्र करावे, हाच या योजनेचा हेतू आहे आणि त्याचा लाभ लवकरात लवकर व्यापाऱ्यांनी घ्यावा.

**-रेश्मा घाणेकर,**
**राज्यकर सहआयुक्त, पुणे**



## बदलते तंत्रज्ञान

### इन्व्हर्टरच्या बॅटरीत नेमके किती पाणी भरायचे?



लाईट गेली तर गोंधळ नको म्हणून अनेकांच्या घरी किंवा दुकानामध्ये इन्व्हर्टर बसवण्यात येतो. यामुळे पावसाळा असो किंवा उन्हाळा, दिवस असो किंवा रात्र लाईट गेली तरी कोणतीही काम अडत नाहीत, मात्र इन्व्हर्टरच बिघडला तर मोठा गोंधळ होऊ शकतो. बॅटरी हा इन्व्हर्टरचा एक महत्त्वाचा भाग आहे. यामुळेच इन्व्हर्टरच्या बॅटरीची काळजी घेणे आवश्यक आहे. इन्व्हर्टरमध्ये योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाणी भरणे, तसेच पाणी बदलणे गरजेचे आहे. इन्व्हर्टरमध्ये योग्य वेळी पाणी भरून तुम्ही इलेक्ट्रोलाईट्स पातळी वाढवून इन्व्हर्टरची लाइफ वाढवू शकता.

सामान्यत: काही गोष्टींकडे लक्ष दिल्यास बॅटरी नेमकी कधी बदलायची आहे हे तुमच्या लक्षात येऊ शकते.

**इंडिकेटर लाईन्सकडे लक्ष द्या** : अनेक इन्व्हर्टरच्या बॅटरीमध्ये बॅटरीच्या वरील बाजूला किंवा समोर काही इंडिकेटर लाईन्स असतात. या लाईन बॅटरीमध्ये किती पाणी भरावे हे दर्शवण्यासाठीच असतात. तसेच काही वेळा इन्व्हर्टरसोबत मिळालेल्या मॅन्युअलमध्ये देखील ही माहिती देण्यात आलेली असते. ही सर्व माहिती वाचूनच बॅटरीमध्ये पाणी भरा.

**डिस्टिल वॉटर** : बॅटरीसाठी कायम डिस्टिल किंवा डिमिनरलाइज्ड पाण्याचा वापर करण्यात यावा. हे पाणी उकळत्या पाण्याच्या वाफेपासून तयार करण्यात येते. यात कोणत्याही प्रकारची अशुद्धता नसते. अनेकजण नळाचे किंवा साठवलेल्या पाण्याचा बॅटरीसाठी वापर करतात. यामुळे बॅटरी लवकर खराब होवू शकते.

**स्वाइंग हायड्रोमीटरचा वापर करा** : स्वाइंग हायड्रोमीटरमुळे बॅटरीतील ॲसिडच्या पातळीचं प्रमाण मोजण्यास मदत होते. यामुळे तुम्हाला बॅटरीमध्ये योग्य प्रमाणात पाणी भरण्याचा अंदाज येतो.


**कंपनीच्या सूचनांचे पालन करा** : बॅटरीची निर्मिती करण्यात आलेल्या कंपनीकडून देण्यात आलेल्या सुचनांप्रमाणेच बॅटरीत पाणी भरा. अनेकदा इतर वापरकर्ते काही सल्ले देतात. मात्र प्रत्येक कंपनीच्या बॅटरीमध्ये काही फरक असू शकतो. त्यामुळे तुम्ही वापरत असलेल्या बॅटरी निर्मात्याकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करा.

# परमवीर चक्रप्राप्त कॅ. विक्रम बत्रा

भारतीय लष्कराचे शहिद जवान विक्रम बत्रा यांनी कारगिल युद्धात केलेली कामगिरी सर्वश्रुत आहे. त्यांच्या योगदानाबद्दल, त्यांना मरणोत्तर परमवीर चक्र, भारताचा सर्वोच्च लष्करी सन्मान मिळाला.

९ सप्टेंबर १९७४ रोजी हिमाचल प्रदेशातील पालमपूर येथे विक्रम बत्रा यांचा जन्म झाला. त्यांची आई, कमल कांता बत्रा या घरी राहणाऱ्या आई होत्या, तर त्यांचे वडील जी. एल. बत्रा हे सरकारी शाळेचे मुख्याध्यापक होते. विक्रम त्यांच्या उत्कृष्ट बौद्धिक आणि क्रीडा क्षमतेसाठी प्रसिद्ध होते. पालमपूरच्या डीएव्हीमधून पदवी घेतल्यानंतर विक्रमने विज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी प्रादेशिक सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेतला, परंतु त्यांना लवकरच समजले की, सैन्यात सामील होणे हे त्यांचे खरे स्वप्न आहे.

त्यांनी १९९६मध्ये देहरादून, उत्तराखंड येथील इंडियन मिलिटरी अकादमीमध्ये प्रवेश घेतला. १९९७मध्ये, त्यांची भारतीय लष्कराच्या जम्मू आणि काश्मीर रायफल्सच्या १३व्या बटालियनमध्ये लेफ्टनंट म्हणून नियुक्ती झाली. ते त्यांच्या नेतृत्व क्षमता, मानसिक धैर्य आणि शारीरिक स्थितीसाठी प्रसिद्ध होते. सोपोर, जम्मू आणि काश्मीर येथे, जिथे ते प्रथम तैनात झाला होते, विक्रमने अतिरेक्यांविरुद्ध बंडखोरीविरोधी कारवायांमध्ये भाग घेतला. नंतर त्यांना सियाचीन ग्लेशियरवर हलवण्यात आले, जिथे त्यांनी सहा महिने पृथ्वीवरील सर्वात कठीण ठिकाणी काम केले.




## निमित्त

विक्रम बत्रा यांना मे १९९९मध्ये जम्मू आणि काश्मीरच्या द्रास सेक्टरमध्ये नियुक्त करण्यात आले होते. जेव्हा भारतीय सैन्याने या प्रदेशात घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैनिकांशी रक्तरंजित संघर्ष केला होता. कारगिल युद्धाच्या सुरुवातीला विक्रमचा थेट सहभाग होता. विक्रम बत्रा यांनी संघर्षादरम्यान त्यांच्या सैन्याची देखरेख केली आणि अनेक महत्त्वपूर्ण मोहिमांमध्ये भाग घेतला. १९ जून १९९९ रोजी त्यांना आणि त्यांच्या गटाला पॉइंट ५१४० या प्रदेशातील एक महत्त्वपूर्ण शिखर जिंकण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. विक्रम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्रतिकूल परिस्थिती असतानाही शिखरावर जाण्यात आणि स्थानावर ताबा मिळवण्यात यश आले. ७ जुलै १९९९ रोजी टायगर हिल या नावाने ओळखले जाणारे पॉइंट ४८७५ ताब्यात घेण्यासाठी विक्रम बत्रा यांनी आणखी एका महत्त्वपूर्ण ऑपरेशनमध्ये भाग घेतला.

शत्रूचा बचाव मजबूत होता आणि भारतीय सैन्य अनेक दिवसांपासून ते ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत होते. त्यानंतरच्या गोळीबारात विक्रमला गोळी लागली, पण त्यांनी लढण्याचा आग्रह धरला. अखेरीस त्यांना पुन्हा एकदा मार लागला आणि त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या शौर्य आणि निस्वार्थीपणासाठी, त्यांना मरणोत्तर भारताने सर्वोच्च लष्करी सन्मान परमवीर चक्र प्रदान केले.

विक्रम बत्रा रेजिमेंटल सेंटर हे नाव भारतीय सैन्याने त्यांच्या सन्मानार्थ प्रशिक्षण सुविधेला दिले आहे. त्यांच्या सन्मानार्थ सी-१३०जे हे भारतीय हवाई दलाच्या मालकीचे वाहतूक विमान आहे. विक्रम बत्राच्या जीवनावर अनेक पुस्तके, माहितीपट आणि चित्रपट बनवले गेले आहेत. भारतीय लष्कराने २००३मध्ये कारगिलचा शेरशाह : कॅप्टन विक्रम बत्रा, पीव्हीसी या शीर्षकाचे पुस्तक प्रसिद्ध केले. परमवीर : अवर हिरोज इन वॉर आणि विक्रम बत्रा : कारगिलचा शेरशाह यांसारख्या इतर अनेक कादंबऱ्यांचाही तो विषय आहे. २०१९मध्ये शेरशाह नावाचा विक्रम बत्राच्या जीवनावर आधारित एक बॉलिवूड चित्रपट प्रदर्शित झाला. अनेक देशांनी विक्रम बत्रा यांच्या शौर्य आणि निस्वार्थीपणाबद्दल त्यांचे कौतुक केले आहे. जर्सी शहरातील एका रोडवेला २०१७मध्ये तेथील भारतीय-अमेरिकन समुदायाने त्यांचे नाव दिले होते. कॅप्टन विक्रम बत्रा वे जर्नल स्क्वेअर शेजारील रस्ता आहे.

**-साभार इंडियन प्रोफेशनल लर्निंग**

## क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : बोर्लीपंचतन येथे पारंपरिक खेळ खेळताना रोहिदास समाजाचे गोविंदा पथक.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

### 'या' लोकांनी कधीही खाऊ नये कच्चे लसूण



प्राचीन काळापासूनच लसूण आपल्या आयुर्वेदिक-औषधी गुणांसाठी ओळखला जातो. लसूणमध्ये ॲलिसिन, ॲलिसिनिन, अँटी-ऑक्सिडेंट्स आणि फायटोकेमिकल्स यासारख्या पोषकतत्त्वांचा समावेश आहे. हे घटक आपल्या शरीरासाठी पोषक आहेत. पण तरीही काही लोकांनी कच्च्या लसणाचे सेवन करणं टाळावे. अन्यथा कित्येक समस्या उद्भवू शकतात. जाणून घेऊया कोणी लसूण खाऊ नये आणि का खाऊ नये.

**गर्भवती महिला** : गर्भवती महिलांनी कच्चे लसूण खाणे टाळावे. कारण यामुळे प्रसूतीच्या वेदना सुरू होऊ शकतात. कच्च्या लसणाच्या सेवनामुळे ॲसिडिटीची समस्या वाढू शकते. ज्यामुळे पोटात जळजळही होऊ शकते.गर्भवती महिलांच्या पचनप्रक्रियेवरही वाईट परिणाम होऊ शकतो. म्हणून अशा परिस्थितीत महिलांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसारच आहारामध्ये लसणाचा समावेश करावा.

**पोटाशी संबंधित समस्या** : कच्च्या लसणामुळे पोटात जळजळ होणे, पेटके येणे यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. कारण कच्च्या लसणामध्ये ॲसिडिक गुणधर्म असतात आणि याचे अधिक प्रमाणात सेवन केलं तर ॲसिडिटीची समस्या निर्माण होऊ शकते.

**शस्त्रक्रिया करण्यापूर्वी** : लसणाच्या सेवनामुळे रक्तस्त्राव होण्याचा धोका वाढू शकतो. कच्च्या लसणामुळे रक्त पातळ होऊ शकते, ज्यामुळे शस्त्रक्रियेदरम्यान अथवा शस्त्रक्रियेनंतर रक्तस्त्राव होतो. म्हणूनच शस्त्रक्रियेच्या काही दिवसांपूर्वी तसेच शस्त्रक्रियेच्या दिवशी कच्च्या लसणाचे सेवन करू नये.

**रक्त पातळ करणारी औषधे** : रक्त पातळ करणाऱ्या औषधांचे सेवन करण्याच्या वेळेस कच्च्या लसणाचे सेवन करू नये. कारण लसणामध्ये ॲलिसिन नावाचे कम्पाऊंड असते, जे शरीरातील रक्त पातळ करू शकते आणि यामुळे रक्तस्त्रावाची समस्या वाढू शकते.

**टीप : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. अधिक तपशीलांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊ शकता.**

# सावरोली-खारपाडा मार्ग ठरतोय धोकादायक

## आठवडाभरात तिघांचा अपघाती मृत्यू; सुरक्षा उपाययोजनांची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

औद्योगिक नगरीला जोडणारा महत्त्वाचा राज्यमार्ग सावरोली-खारपाडा रस्ता सुरक्षा उपाययोजनांच्या अभावामुळे दिवसेंदिवस धोकादायक होत असून आठवड्यात तीन बळी या मार्गावर गेले आहेत.

सावरोली-खारपाडा मार्गावर धोकादायक वळणे, उतार तसेच अपुरी साईडपट्टी यामुळे अपघात प्रमाण वाढत आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असलेला आणि सध्या ठेकेदाराकडे देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सावरोली-खारपाडा मार्गाची आहे. सावरोली-खारपाडा राज्यमार्ग पाताळगंगा औद्योगिक वसाहतीला जोडला गेला असून राज्यमार्गाचे एक टोक मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तर दुसरे मुंबई-गोवा महामार्गाला जोडले आहे. त्यामुळे कायम वाहतुकीने व्यस्त असा रस्ता आहे. जवळपास २०पेक्षा अधिक गावे, वाड्या, वस्ती या रस्त्याला जोडून आहेत. प्रवासी वाहतूक तसेच कारखान्यात येजा करणारी अवजड वाहनांची वाहतूक रात्र दिवस सुरू असते.



रस्ता अरूंद असून खरसुंडी, पौंधनजिक घातक वळणाचा रस्ता आहे. वारंवार अपघात घडत आहेत, तर वानिवली गावानजीक कार्बन कारखान्यासमोर तीव्र उताराचा रस्ता आणि लगेच अवघड वळण यामुळे जीवघेणे अपघात घडत आहे.

या सर्व ठिकाणी कोणतेही दिशादर्शक तसेच माहिती फलक नसल्याने वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नसून अपघात घडत आहेत. आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक किंवा रम्बंलिग स्ट्रीप्स बसविल्यास अपघातावर नियंत्रण मिळविणे शक्य होईल. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देऊन ठेकेदाराकडून आवश्यकता उपाययोजना कराव्यात जेणेकरून जीवघेणे अपघात टाळता येतील अशी प्रवाशांची मागणी आहे.

### ■ असे झाले अपघात

*सावरोली-खारपाडा मार्गावर तीव्र उतारानंतर वळणावर अनियंत्रित झालेला टँकर केळकर कंपनीसमोर झाडाला ठोकून चालक जागीच ठार झाला होता, तर त्याच्या दोन दिवस अगोदर दुचाकी एकमेकांवर धडकल्याने दोन जण ठार तर तीन गंभीर जखमी झाल्याची घटना घडली होती. याशिवाय सातत्याने अपघात घडत असून वानिवली गावानजीक ट्रेलरवरून कॉईल निसटल्याने आठपेक्षा अधिक दुचाकीचा चक्काचूर झाला होता. या मार्गावर वाशिवली, धामणी गावानजीक रस्त्याला साईडपट्टी नसून अवजड वाहनामुळे जीवघेणे अपघात घडले आहेत.*

## मानिवलीतील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील मानिवली ग्रुप ग्रामपंचायतीमधील शेकापच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी विधानसभा मतदारसंघ उपाध्यक्ष सुधाकर डायरे यांच्या प्रयत्नाने राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. सर्व कार्यकर्त्यांचे घारे यांनी स्वागत केले.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, प्रदेश पदाधिकारी भरत भगत, तालुकाध्यक्ष भगवान चंचे, कार्याध्यक्ष शिवाजी खारीक, बळीराम देशमुख, सुधाकर डायरे, प्रवीण देशमुख, तसेच स्वप्निल पालकर, अतुल दुर्गे, प्रदीप दुर्गे, सागर गवळी, रवी गवळी, मंगेश डायरे, महेश खाडे, सुरज डायरे आदी उपस्थित होते.

## बेलोशी येथे नेत्रतपासणी

**रेवदंडा** : अलिबाग तालुक्यातील बेलोशी येथे श्री सत्यसाई संघटना, मुंबई मेट्रो प्रदेश, महाराष्ट्र आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांचे विद्यमाने मंगळवारी मोफत नेत्र व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. शिबिरात १४० जणांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २६ मोतिबिंदू रूग्ण असून शस्त्रक्रियेसाठी २६ जणांना पनवेल येथे पाठविण्यात येणार आहेत.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांच्या सांगण्यावरून मी **कै.कमळी काळ्या पाटील (मयत)** तर्फे वारस १) कै. लाडकूबाई उर्फ लक्ष्मी लक्ष्मण पंडित (मयत मुलगी तर्फे वारस १. १) चंद्रकांत लक्ष्मण पंडित (नातू) १.२) कै.सीताराम लक्ष्मण पंडित (मयत नातू)तर्फे वारस १.२.१ ) अंजनी सीताराम पंडित (नात सून) १.२.२) मनीषा सीताराम पंडित (पणती)१.२.३) अलंकार सीताराम पंडित (पणतू) १.२. ४) प्रभाकर लक्ष्मण पंडित (नातू) १.२.५) सुशीला हरी भोईर (नात) २) कै.जनाबाई नामदेव पंडित (मयत मुलगी तर्फे वारस २.१ ) गुलाब बाळकृष्ण मोहिते (नात) २.२) रामनाथ नामदेव पंडित (नातू) २. ३)अनुसया दिलीप केणी (नात) २.४) सुनीता राजेश मोहिते (नात) ३) कै.बयोवबाई गोपीनाथ मोहिते (मयत मुलगी तर्फे वारस) ३.१) गणेश गोपीनाथ मोहिते (नातू) ३.२) विजय गोपीनाथ मोहिते (नातू) ३. ३) दयानंद गोपीनाथ मोहिते(नातू) ३.४) प्रतिभा धर्मेंद्र घरत (नात) ४) कै.यमुनाबाई मधुकर पाटील (मयत मुलगी तर्फे वारस)४.१) प्रकाश मधुकर पाटील (नातू) ४.२)कुंदाबाई जनार्दन भोईर (नात) ४.३) प्रमिला गणेश भगत(नात) ४.४) तुलना सुदाम झावरे (नात) ४.५) कै.संजय मधुकर पाटील (मयत नातू तर्फे वारस ४.५.१)शोभा संजय पाटील (नात सून) ४.५.२) विकी संजय पाटील (पणतू) ४.५.३) विराज संजय पाटील (पणतू) ५) कासूबाई चंदर पाटील (मुलगी) रा. ता. उरण जि.रायगड **(''जमिन मालक'')** यांचे खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील ('सदर मिळकत') स्वामित्व हक्क तपासात आहे.

तरी सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत आगर तिचे हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा इसम/इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा व/किंवा, कोणत्याही कराराद्वारे मागणी, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, कुळ, पोटकुळ, लिज, सबलिज, गहाण (ईक्विटेबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षीस, लिन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, पोटगीचा हक्क, दान, ताबा, कब्जा, ईजमेंट, असाईनमेंट, लायसन्स, निशाणी (डीवाईस), डिमाईस, वाटप, प्लेज, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, सह उद्योग, भागीदारी, सहयोग, कर्ज, आगाऊ देणे, भुसंपादन, लेखी मागणी, बोजा, एफएसआय/टीडीआर हक्क/वापर, मनाई किंवा इतर ऑटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा, अधिकाऱ्यांचा, न्यायाधिकरणाचा, महसुली वा सविधी मान्य (स्टॅटयूटरी) अधिकाऱ्यांचा, प्रशासकीय, अधिकाऱ्यांचा हुकूमनामा,आदेश, ऑवॉर्ड अथवा न्याय निर्णय, जप्ती, चालू वहिवाट आगर लागू केलेल्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेला हक्क, अग्रक्रयाधिकार, इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम,हक्क,असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात, याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती संबंधी दावा/दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/ किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल.

**परिशिष्ट**

**मौजे- बेलोंडाखार, ता उरण व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९४ | ६ | ०-३७-७०<br>पो.ख ०-००-९०<br>एकुण ०-३८-६० | ५.८७ |
| ९५ | १/ब | ०-२७-८०<br>पो.ख ०-०४-३०<br>एकुण ०-३२-१० | ४.२५ |

दिनांक : ०९ /०९/२०२३

सही /-
**ॲड. वृषाली नायर**
फ्लॅट न. १६, दूरवाणि सी. एच. एस.,
वामन राव पै मार्ग , सेक्टर ६ ,
सी. बी. डी. बेलापूर ४००६१४.
मोबाईल नं. ९१३७१३३९१८.


# हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने रोह्यात रंगला गोविंदाचा थरार

**रोहे : प्रतिनिधी**

गोविंदाचा उत्सव रोह्यात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. मी राज्य सरकारला विनंती करेन, दहीहंडीला खेळ म्हणून मान्यता मिळाली तर मला विश्वास आहे गोविंदा पथकासोबत माझे तरुण मित्र व भगिनी असेल त्यांना स्फूर्ती मिळेल, असे मत खासदार सुनील तटकरे यांनी सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दहीहंडी स्पर्धेच्या वेळी व्यक्त केले.

या वेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, सरचिटणीस सुरेश मगर, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे आदी उपस्थित होते.

वरुणराजाच्या साक्षीने गोविंदाचा थरार पहावयास मिळत होता. स्टेजवर संगिताची व नृत्याची मेजवानी मिळत होती. गावदेवी देवकान्हे व जयभवानी रोठ या गोविंदा पथकांनी आठ थर लावत मुख्यहंडी पारितोषिक २,२२,२२२ रुपये पटकाविले. सात थर लावलेल्या पुरूष गोविंदा पथकात श्रीचोंडेश्वरी वरवठणे, विठाबाई खारपाले पेण, रुद्रअवतार खारपाले पेण, जयभवानी खारगाव, जय हनुमान कोलेटी पेण, आई जोगेश्वरी नागोठणे, काळभैरव वरसे, जयबजरंग लांढर, जाणता राजा महाड, श्रीवाकेश्वर महाराज किल्ला, जयहनुमान आमडोशी, जयभवानी रोठखुर्द, काळभैरव बोरघर, श्रीगावदेवी देवकान्हे, श्रीगावदेवी बाहे, लोटणेश्वर खारी, श्रीसापया वरसगाव, श्रीसोनभैरव खांदाड माणगाव, नवतरूण-तळाघर; सहा थर लावणारे पुरूष गोविंदा पथक मरीआई वांगणी, सोनेश्वर निवी, काळभैरव उडदवणे, शिवछत्रपती पन्हळघर माणगाव, शिवशाही तळेगाव माणगाव, बापदेव महाराज अष्टमी, वीर हनुमान संभे, जाखमाता वेलशेत, नागोठणे, स्वयंभू विठ्ठलनगर रोहा, सोनारसिद्ध धाटाव, जयभवानी गावठाण रोहा, जय बापदेव वणी, नागोठणे, गावदेवी करंजखोल महाड, चार थर लावणारे महिला गोविंदा पथक सोनेश्वर निवी, शिवशाही तळेगाव माणगाव, शिवछत्रपती पन्हळघर, लोणेरे माणगाव, लोटणेश्वर खारी, आई कोसबाय देवी निडी, गावदेवी करंजखोल महाड, सोनभैरव खांदाड माणगाव, पाच थर लावणारे गोविंद पथक रूद्र अवतार खारपाले पेण, जय भवानी रोठखुर्द; तीन थर लावणारे गोविंदा पथक द योगा रोहा यांनी रोख रक्कम व सन्मानचिन्ह देण्यात आले.

**महिला पथकांनीही दाखविले कौशल्य**



## सैनिक वासुदेव चोरगे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील तोरणपाडाचे सुपुत्र भारतीय सैन्यामधील मराठा रेजिमेंट बटालियनमध्ये कार्यरत असलेले वासुदेव दत्तात्रेय चोरगे हे सेवानिवृत्त होऊन नुकतेच आपल्या गावी परतले. त्यांच्या मूळगावी त्यांचे मोठ्या धूमधडाक्यात, उत्साहात स्वागत करण्यात आले.

भारतीय सैनिक वासुदेव दत्तात्रेय चोरगे यांनी सैन्य दलात एकूण १८ वर्षे सेवा केल्यानंतर ते ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. म्हणूनच त्यांचा सेवापूर्ती सोहळा सुधागड तालुक्यातील परळी, जांभूळपाडा, फलसुंडे, आसरे, पेडली, तोरणपाडा या गावात येथील अनेक मान्यवर, ग्रामस्थ यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, हार, श्रीफळ देऊन मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.



# ललित पाटील मित्र मंडळाच्या दहीहंडीला महिला पथकाची सलामी



**पेण : प्रतिनिधी**

पेणकरांचे मुख्य आकर्षण असलेल्या ललित पाटील मित्र मंडळाच्या दहीहंडीमध्ये प्रथमच रुद्रावतार महिला गोविंदा पथकाने सलामी देत प्रेक्षकांची मने जिंकली.

दहीहंडी उत्सवाला प्रोत्सहान देण्यासाठी या वेळी मंचावर आमदार रविशेठ पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी जि. प. सदस्य कौसल्या पाटील, माजी नगरसेविका देवता साकोरकर, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, माजी उपनगराध्यक्ष दिलीप लाड, माजी नगरसेवक प्रकाश रामाणे, उद्योजक राजू पिचिका, भाजप महिला शहर उपाध्यक्ष निशिगंधा गुंड, माजी नगरसेवक दर्शन बाफणा, माजी नगरसेवक संतोष पाटील, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर आदींसह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली.

या वेळी वरद विनायक गोविंदा पथक नवेगाव, पेण, श्रीराम मित्र मंडळ, कुंभार आळी, खालापूर, द्रोणागिरी साई गोविंदा पथ करंजा, उरण, बालमित्र गोविंद पथक, गडब, रुद्रावतार गोविंदा पथक, खारपाले, पेण, रुद्रावतार महिला गोविंदा पथक, खारपाले, पेण या पथकांनी पाच ते सहा थरांची सलामी देत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

रिमझिम पावसात गोविंदा पथकाचा उत्साह द्विगुणित झाला होता. सलामी देणाऱ्या पथकाला मान्यवरांच्या हस्ते प्रत्येकी पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी स्माईल डान्स अकेडमी (आवरे) या कलाकारांच्या नृत्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

ललित पाटील यांचे चिरंजीव अमोघ ललित पाटील यांच्या हस्ते व ललित पाटील मित्र मंडळाच्या सदस्यांनी ही हंडी फोडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राकेश म्हात्रे यांनी केले.


सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष ९, अंक ६०** | **मंगळवार, सप्टेंबर ५, २०२३ / भाद्रपद १४, शके १९४५** | **पृष्ठे २, किंमत रुपये ११.००**

### असाधारण क्रमांक ९१
### प्राधिकृत प्रकाशन
### जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी रायगड - आलिबाग यांजकडून

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.चे कलम १९ अन्वये घोषणापत्र**

क्रमांक भुसंपादन/टे-६/मौजे पिसावे/ मौजे पिसावे /१९ ची अधिसूचना / प्रसिद्धी / २०२३. - ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पादर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक कोकण विभागीय पुरवणीमध्ये बुधवार दिनांक ०७ जून २०२३ रोजी प्रारंभिक अधिसूचना प्रसिध्द झालेली आहे आणि याद्वारे असे अधिसूचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत माझी खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निरंक निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषीत केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये निरंक विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकाऱ्यांची कर्तव्य पार पाडण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम ३ (ग) अन्वये तसेच महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ ऑगस्ट २०१४ रोजी जारी केलेले भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१४ चे नियम क्र. २ छ अन्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याअर्थी त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही व प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करुन सुरु करावी असे निर्देश देण्यात येत आहे.

२ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, सप्टेंबर ५, २०२३ / भाद्रपद १४, शके १९४५

**अनुसूची एक**
**( संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)**
**मौजे पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं/ हिस्सा नं | संपादन करावायाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | १२९/१ | ०-०७-०० |

**अनुसूची दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपात विवरण**

**प्रकल्पाचे नाव :-** डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड अंतर्गत दिवा पनवेल सेक्शन मधील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पिसार्वे दरम्यान असलेल्या इ.जी. म. १० मार्गावरील रेल्वे क्रॉसिंग क्र. ९ सी, भाग निळजे ते तळोजा किलोमीटर ५५/८०० ता. पनवेल, जि. रायगड येथील रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम.

**प्रकल्पाचे कामाचे वर्णन :-** मौजे पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमीन दिवा पनवेल सेक्शन मधील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पिसार्वे दरम्यान असलेल्या इ. जी. म. १० मार्गावरील रेल्वे क्रॉसिंग क्र. ९ सी, भाग निळजे ते तळोजा किलोमीटर ५५/८०० ता. पनवेल, जि. रायगड येथील रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकामासाठी संपादन.

**समाजाला मिळणारे लाभ :-** मौजे पिसार्वे, ता. पनवेल येथील जमीन दिवा पनवेल सेक्शन मधील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पिसावें दरम्यान असलेल्या इ.जी.म. १० मार्गावरील रेल्वे क्रॉसिंग क्र. ९ सी, भाग निळजे ते तळोजा किलोमीटर ५५/८०० ता. पनवेल, जि. रायगड येथील रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर येथील रेल्वे फाटक बंद होणार असून पिसार्वे गावातील लोकांना ये-जा करण्यासाठी सोयीचे होणार आहे.

**अनुसूची तीन**
**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**
**निरंक**

**अनुसूची चार**
**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा सारांश**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ, दिनांक २४ मे २०२३ अन्वये भूमी संपादन / पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिलेली आहे.

**अनुसूची पाच**
**प्रशासक नियुक्तीचे विवरण**
**निरंक**

टीप: प्रस्तूत जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांचे कार्यालयात निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

आलिबाग,
दिनांक ३१ ऑगस्ट २०२३.

**सही/-**
**डॉ. योगेश म्हसे,**
**जिल्हाधिकारी रायगड,**

**क्र. जिमाका/राअ/जाहि/९५/२०२३-२४**

# तुर्भे, शिरवणेतील धबधब्यांवर पर्यटकांची गर्दी

## पोलीस गस्त वाढविण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईचा नायगरा म्हणून ओळखला जाणारा पांडवकडा धबधबा आणि खारघरची टेकडी पर्यटकांना नेहमीच आकर्षित करते, मात्र सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर खारघर पोलीस आणि सिडको प्रशासनाकडून पावसाळ्यात १७ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत खारघर टेकडी आणि पांडवकडा येथे पर्यटकांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. त्यामुळे आता धबधबा प्रेमीची पावले शिरवणे एमआयडीसी मधील डोंगररांगातूंन फेसळणाऱ्या धबधब्याकडे वळत आहेत. तब्बल एक महिन्याच्या विश्रांती नंतर पुन्हा पावसाने जोर पकडला असल्याने आपला जीव धोक्यात घालुन तरुणाई पुन्हा पावसाळी सहलीचा आनंद लुटू लागली असून नवी मुंबई पोलिसानी या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवावा, अशी मागणी होत आहे.

शिरवणे एमआयडीसी परिसरातील बंद दगड खाणीच्या खदानी अवाढव्य मोठ्या असल्याने तरुणाई त्या ठिकाणी जीव धोक्यात घालून ऑगस्ट महिन्यात पोहण्याचा आनंद लुटत होती.या ठिकाणी तरुणाईचा पर्यटकांचा लोंढा दिवसेंदिवस वाढू लागला आहे.जुईनगर स्टेशन पासून काही अंतरावरच तुर्भे, शिरवणे एमआयडीसीतुन रिक्षाने हे हौसे पर्यटक डोंगरावरून फेसळणाऱ्या धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पायपीट करत आहेत. महात्मा गांधी नगर व बोनसरी गाव येथील बंद दगड खाणीच्या धोकादायक रस्त्यातून पायी प्रवास करत काही मैल पायपीट करत धबधबे गाठले जात आहेत. या परिसरात असणाऱ्या विशाल हॉटले जवळ बाईक, चारचाकी वाहने उभी करून तरुणाई धबधब्या कडे वाटचाल करतात. विशेष म्हणजे, या भागात बंद असणाऱ्या दगड खाणीत वर्षभर पाणी भरलेलेच असते. अनेकांना या



दगड खाणीतल्या पाण्याचा अंदाज देखील नसल्याने जीव धोक्यात घालून पोहण्यासाठी उतरतात.

दगड खाणीतल्या पाण्यात आजपर्यंत अनेकांचा बुडून मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये शालेय विद्यार्थांचादेखील समावेश आहे. या परिसरात विकेंडला तर हौशी पर्यटकांची जत्राच भरली जाते. नवी मुंबई आणि मुंबईतील तरुणाई मोठ्या प्रमाणात गर्दी करते.

ऑगस्ट महिन्यात तुर्भे पोलिसांनी या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. आम्ही काही स्वयंसवकांना घेऊन शनिवार आणि रविवारी जातीने हजर राहून इथ येण्यापासून पर्यटकाला मज्ञाव करत होतो असे सामाजिक कार्यकर्ते आणि भाजप ओबीसी सेल नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष राजेश पाटील यांनी सांगितले.


### धोकादायक ठिकाणी फलक हवेत!

पावसाळ्यात पूर्वेकडे असणाऱ्या परिसराचे विहंगम दृश्य, डोंगर दऱ्यातून झिरपणारे नदी, नाले आणि धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांचे पावले शिरवणे धबधबा, तुर्भे व पावणे येथील धबधब्याकडे वळतात, पण या ठिकाणी असणाऱ्या धोकादायक जागी फलकदेखील लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे तरुणाई आपल्याच मस्तीत एन्जॉय करते. सुटीच्या दिवशी तर गर्दी असतेच पण इतरही दिवशी आता गर्दी होऊ लागली आहे.

**पावसाने पुन्हा जोर पकडला असल्याने येथे पाहण्यासाठी पर्यटकाची पुन्हा गर्दी होईल. ऑगस्ट महिन्यात पोलिसानी इथ बंदोबस्त ठेवला होता. शनिवार आणि रविवार वीक एंड पाहता तुर्भे पोलिसांनी या ठिकाणी गस्त वाढवावी. वनविभागाने धोकादायकच ठिकाणी फलक लावावे, जेणेकरून पर्यटक खबरदारी घेतील. खारघर मध्ये जशी पर्यटकांना बंदी घातली आहे तशी बंदी या ठिकाणी घालावी.**
**–राजेश पाटील, नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, भाजप ओबीसी सेल**


## निवडक

### उमाजी नाईक यांना अभिवादन



**नवी मुंबई :** भारतीय स्वातंत्र लढ्यातील सशत्र क्रांतीचे प्रथम जनक ब्रिटिशांविरुद्ध लढणारे आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी कोंकण भवनातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. 'मरावे परि क्रांतिरूपे उरावे' अशी उक्ती आहे ती राजे उमाजी नाईक यांच्याबद्दल तंतोतंत जुळते. त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वतःला रोखू शकले नाहीत. राजे उमाजी नाईकांपुढे छत्रपती शिवरायांचा आदर्श होता.

### गोवर्धनी मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा



**नवी मुंबई :** कृष्णाष्टमी निमित्त बेलापूर किल्ले गावठाण येथील आई गोवर्धनी माता मंदिराचा १६ वा जीर्णोद्धार सोहळा थाटामाटात संपन्न झाला. या वेळी मंदिरात हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सर्व भक्तांची सर्व संकटे दूर होऊन त्यांना सुख, शांती आणि समृद्धी जीवन लाभो, अशी प्रार्थना आई गोवर्धनी मातेला केली असल्याचे बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले. या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धार १५ वर्षापूर्वी उद्योजक विजय म्हात्रे व आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या हस्ते गोकुळाष्टमीच्या दिवशी करण्यात आला होता. त्यानुसार दरवर्षी गोकुळाष्टमीच्या दिवशी यथोचित पूजा–अर्चा करून येथे उत्सव साजरा केला जातो.

### येत्या सोमवारी लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन येत्या सोमवारी (दि. ११) सकाळी १०.३० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कोकण विभाग, यांचे कार्यालय, समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोकण विभागाचे उपआयुक्त (सामान्य प्रशासन) अजित साखरे यांनी कळविले आहे.

### नाईक महाविद्यालयात कविसंमेलन

**नवी मुंबई :** कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक महाविद्यालयाच्या प्रांगणात संवाद नात्यांचा कविता डॉट कॉम उत्साही वातावरणात झाले. नेरूळ ज्येष्ठ नागरिक संघाचे कोषाध्यक्ष व ग्रंथालयाचे अध्यक्ष विकास साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या संमेलनात मान्यवर व नवोदित कवींनी आपल्या कविता उत्स्फूर्तपणे केल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली झालेल्या या कविता डॉट कॉम मासिक संमेलनात नवोदित कवींनी अत्यंत आत्मविश्वासाने कविता सादर केल्या.





**पनवेल : मुंबई विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कार फुंडे येथील येथील वीर वाजेकर महाविद्यालयातील प्रा. डॉ. मऱ्याप्पा सोनवले यांना मिळाला आहे. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. या वेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. जे. पवार उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)



**पनवेल : कर्मवीर भाऊराव पाटील हायस्कूल मोखाडा येथे उपशिक्षक असलेले संतोष पाटील यांची दापोली पारगाव येथील अ. पां. भोईर विद्यालयात बदली झाली आहे. याबद्दल त्यांनी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य संजीवनी म्हात्रे, ऋतूजा म्हात्रे–महामुनी यांच्यासह शिक्षिका उपस्थित होत्या.**

# उलवे नोडमध्ये रंगला भव्य दहीहंडी उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उलवे नोड आणि महिला मोर्चाच्या वतीने भव्य दहिहंडी उत्सव २०२३ आयोजीत करण्यात आला असून सोनारी येथील सिद्धीविनायक गोविंदा पथकाने प्रथम क्रमांक पटकावाला. त्यांना १ लाख ११ हजार १११ रुपये देऊन मान्यवरांच्याहस्ते सन्मानीत करण्यात आले. हा उत्सव माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरलं तर मग या सिरीयल मधील प्रियंका तोंडेलकर यांची प्रमुख उपस्थिती ठरली.

दहिहंडीनिमित्त उलवे नोड येथे मानवी मनोऱ्यांचा थरार सर्वांना अनुभवयाला मिळाला. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भारतीय जनता पार्टी उलवे नोड आणि भाजप महिला मोर्चा उलवे नोडच्यावतीने भव्य दहिहंडी उत्सव २०२३ चे आयोजन





करण्यात आले होते. या ठिकाणी ३५ हून अधिक मंडळानी भेट देत सलामी दिली. तसेच ही हंडी फोडण्याचा मान सोनारी येथील सिद्धीविनायक गोविंदा पथकाला मिळाला असून त्यांना १ लाख ११ हजार १११ रुपयांचे मानकरी ठरले. या ठिकाणी यंगस्टार म्युझिकलच्यावतीने सांस्कृतीक कार्यक्रम व नाथ अकॅडमीने डान्स सादर केला.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, सदस्या कामिनी कोळी, उषा देशमुख, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, सदस्या गीता ठाकूर, उलवे नोड महिला मोर्चा अध्यक्षा योगिता भगत, भाजप नेते जयवंत देशमुख, हेमंत ठाकूर, अंकुश ठाकूर, निलेश खारकर, सुहास भगत, किशोर पाटील, संदीप पाटील, गजानन घरत, पी. के. ठाकूर, अशीष घरत, नंदा ठाकूर, आशा म्हात्रे, पल्लवी सुर्वे, दीपा मॅडम, अर्चना मिश्रा, संध्या त्रीपाठी, निकीता खारकर, अवधेश माहतो, टीआयपीएलचे डायरेक्टर अमोघ ठाकूर, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, गोविंदा पथक उपस्थित होते.

# विद्युत डीपीलगत पडलेल्या झाडांच्या फांद्या उचलण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर ६मधील महावितरणच्या डीपीलगत पडलेल्या झाडांच्या फांद्या उचलणेबाबत तसेच महावितरणच्या आवारातील झाडांच्या बाहेर आलेल्या फांद्यांची तातडीने छाटणी करण्याची लेखी मागणी महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती व प्रभाग ८५च्या माजी नगरसेविका सुजाता पाटील यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकरांकडे एका निवेदनातून केली आहे.

नेरूळ सेक्टर सहा परिसरात सिडकोच्या शिवम व सागरदीप सोसायटीच्या लगत तसेच मेरेडीयन व शिवालिक सोसायटीसमोर महावितरंणची विद्युत डीपी आहे. या विद्युत डीपीच्या आवारात अनेक झाडे आहेत. शिवम सोसायटीच्या मंदीरालगतच्या



प्रवेशद्वारालगत तसेच शिवालिक सोसायटीच्यासमोर झाडांच्या फांद्या थेट पदपथापर्यत झुकल्या आहेत. पदपथावरून ये–जा करणाऱ्या त्या फांद्यांचा त्रास होत आहे. तसेच मेरेडियन सोसायटीच्या विरूद्ध दिशेला महावितरणच्या पदपथावर असलेला महापालिकेचा दिशादर्शक फलकही या झाडांच्या फांद्यामुळे झाकला गेला आहे. कालच्या पावसात महावितरणच्या आवारातील झाडांच्या फांद्या वाऱ्यामुळे पदपथावर पडल्या आहेत.

पदपथ चालण्यासाठी बंद झाला आहे. आपण संबंधितांना त्या फांद्या तत्काळ हटविण्याचे तसेच पदपथावर आलेल्या व झुकलेल्या फांद्या तत्काळ छाटण्याचे आदेश द्यावेत अन्यथा त्या फांद्या कोणा बालकाच्या अथवा ज्येष्ठ नागरिकावर पडल्यास दुर्घटना होण्याची भीती आहे. समस्येचे गांभीर्य पाहता आपण तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देवून स्थानिक रहिवाशांना दिलासा देण्याची मागणी माजी नगरसेविका सुजाता पाटील यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# मोठे भोम महिला मंडळातर्फे दहीहंडी उत्सव



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोठे भोम महिला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडीच्या, कार्यक्रमात मोठेभोम येथील महिला मंडळाची महिला युवती प्रांजल हरेश पाटील हिने चार थरावरील दहीहंडी फोडण्याचा मान यावर्षीही पटकाविला आहे. सलग तीन वर्ष प्रांजल पाटील ही युवती दहीहंडी फोडण्याचा मान पटकावत आहे.

महिला प्रत्येक क्षेत्रात कुठेच कमी नाही हे यावरून दिसून येते. प्रांजल पाटील ही चिरनेर हायस्कूलची विद्यार्थिनी असून तिने शाळेत असताना, क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. मंडप डेकोरेटर्सचे मालक हरेश पाटील यांची प्रांजल ही सुकन्या आहे. प्रांजल पाटीलच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मोठेभोम ग्रामस्थांनी तिला शाल श्रीफळ देऊन तिचा सन्मान केला.




### श्रावण सरी...

तारकांच्या देशातून
श्रावणाची सर आली
रत्ने भुईत पेरून
रात्र गात्री शहारली
पेंगुळल्या झाडांना ती
नव रत्ने बिलगली
तेज झाडांना देऊन
मुकुटात ग शोभली
श्रावणाची गोड सर
कळ्या फुलांत भिनली
कंठी बाजूबंद हार
मधु रसात माखली
हिरे मोती नि माणिके
मातीवर पहुडली
गवताच्या पात्यांवर
कर्ण फुले झळकली
धरा अलंकार ल्याली
पहाटेच्या मुहुर्ताला
वधुवस्त्रा खुलवते
कटि नदीची मेखला
पागोळ्यांची आभाळाला
मुंडावळ चकाकली
धरतीचा हात घेण्या
भास्कराची स्वारी आली
अलवार या सरींनी
सारी रात्र जागवली
तृप्त चाहूल दारात
सोनपावलांनी आली
रंगा गंधाच्या लुटीची
रात्र श्रावण सरींची
तना मना हर्ष होतो
नक्षत्रांच्या या भेटीची



–स्वाती लेले,
नवीन पनवेल

# दहीहंडी उत्सवांना परेश ठाकूर यांच्या भेटी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील दहीहंडी उत्सवांना पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. या उत्सवांना अनेक सिनेकलाकारांनीही भेट दिली. यामध्ये रोडपाली येथे विजय पाटकर तर तक्का येथे अंजिक्य ननावरे यांनी भेट दिली.

पनवेलमधील कामोठे येथील के.के.शेठ म्हात्रे आणि गोपीनाथ भगत, हिंदवी प्रतिष्ठान, जयदादा युवा मंच, नावडे येथील मैत्री प्रतिष्ठान, प्रदीप भगत युवा मंच, तक्का येथील आशिष नाईक मित्र मंडळ यांच्या वतीने दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सावांना



माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत गोविंद पथकांना प्रोत्साहित केले.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, माजी नगरसेवक हरेश केणी, विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, अजय बहिरा, कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, युवा मोर्चा सरचिटणीस दिनेश खानावकर, महेश पाटील, प्रदीप भगत, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा नेते हॅप्पी सिंग, दामोदर चव्हाण, युवा मोर्चा कामोठ शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, सुशील शर्मा, तेजस जाधव, जयकुमार टीगोले, अभिजित राऊत, बाबा नाईक, अमित जाधव, पवन सोनी, गौरव कांडपिळे आदी उपस्थित होते.



**पनवेल : शहरातील महाराणा प्रताप रोड, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते जज बंगला, परदेशी आळी या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम माजी नगरसेवक तथा भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या पुढाकाराने पूर्ण करण्यात आले. जज बंगला, परदेशी आळी ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक रस्ता दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव मिरवणुकांसाठी मुख्य मार्ग असल्याने नितीन पाटील यांनी रहिवाशांच्या मागणीवरून त्वरित या रस्त्यावरील खड्डे महापालिकेकडून भरून घेतले. यासाठी येथील रहिवाशांनी पाटील यांचे आभार मानले आहेत.**

# रोह्यात भातशेतीसह नाचणीही बहरली

## स्थानिक शेतकऱ्यांकडून भाजीपाल्याचीही लागवड

### पडवळ, काकडी, भेंडी, शिराळी बाजारात विक्रीला

**रोहे : महादेव सरसंबे**

आत्तापर्यंत समाधानकारक पाऊस असल्याने रोहा तालुक्यात भातशेती बहरली आहे. भातशेतीसह नाचणीही बहरली आहे. असाच समाधानकार पाऊस राहिल्यास चांगले उत्पन्न शेतकऱ्यांना मिळण्याची शक्यता आहे.



यावर्षी साधारणतः ८९५० हेक्टरवर भातलागवड करण्यात आली आहे, तर डोंगरमाथ्यावर १७५ हेक्टरवर नाचणी पिकाची लागवड करण्यात आली आहे. यावर्षी पाऊस उशिराने सुरू झाला. जुलै महिन्यात समाधानकारक पाऊस पडला. ऑगस्टमध्ये विश्रांती घेतलेल्या पावसाने सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात पुन्हा हजेरी लावल्याने तालुक्यातील पिकांना या पावसाचा चांगला फायदा होणार आहे.

शेतकऱ्यांनी पारंपारिकसह यांत्रिकी व अन्य पद्धतीचा अवलंबून करून भातलागवड केली आहे. प्रामुख्याने जया, रत्ना या प्रमुख बियाण्यांसह रूपाली, कोमल, जोरदार, वायएसआर, कर्जत ९, सुवर्णा या वाणांची लागवड केली आहे. भातशेतीसह भाजीपाला आता मोठ्या प्रमाणात पिकवला जात आहे. परसबागेसह शेतातही भाजीपाला आता लावला जात आहे.

> **यावर्षी रोहा तालुक्यात शेती बहरली आहे. शेती उत्तम आहे. रोहा तालुक्यात उडदवणे भागात काही ठिकाणी खोडकिडा भातशेतीवर आढळून आला आहे. यासाठी शेतकऱ्यांना औषध फवारणीसह अन्य उपाययोजना करण्याचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.**
>
> **–महादेव करे, तालुका कृषी अधिकारी, रोहा**

शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून यावर्षी कृषी विभागाकडून भाजीपाल्याचे चार हजार किट वाटप करण्यात आले होते. त्यामुळे कृषी विभाग ही शेतकऱ्यांच्या भातशेती बरोबर अन्य उत्पन्नातून आर्थिक स्त्रोत वाढवण्याचा प्रयत्न करत आहे.

भाजीपाल्यामध्ये माठ हे प्रामुख्याने बाजारात विक्रीला येत असताना आत्ता पडवळ, काकडी, भेंडी, शिराळी बाजारात विक्रीला आला आहे. शेतकऱ्यांसह आदिवासी बांधव भाजीपाला विक्रीला आणत आहेत. चांगले उत्पन्न चालू असून त्याला भावही बाजारात मिळत असल्याचे दिसून येते. स्थानिक भाजीपाला ताजा व रासायनिक खतविरहित असल्याने या भाजीपाल्याला चांगली मागणी आहे. यावर्षी काकडीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

## निवडक

### हिरवळ महाविद्यालयात शिक्षक दिन



**माणगाव** : हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड व हिरवळ रात्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रति असलेला आदर व्यक्त करण्यासाठी शिक्षक दिनाचे औचित्य साधून एक सुंदर कार्यक्रम आयोजित केला. विद्यार्थ्यांनी काही तासिका घेऊन एक शिक्षक म्हणून भूमिका निभावली तसेच शिक्षकांबद्दल असलेला सन्मान आपल्या मनोगतातून, कवितांमधून व गायानातून व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून ट्रस्टच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम, प्रा. ज्योती पुजारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### पिगोंडे तंटामुक्त अध्यक्षपदी प्रशांत बडे



**नागोठणे** : नागोठणेजवळील पिगोंडे ग्रुप ग्रामपंचायतीची ग्रामसभा मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयात झाली. या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी प्रशांत राजेंद्र बडे यांची एकमताने निवड करण्यात आली. या वेळी सरपंच संतोष कोळी, ग्रामसेवक विजय अहिरे, उपसरपंच कांचन माळी, माजी उपसरपंच सखाराम घासे, सदस्य शैलेश शेलार, रंजना माळी, कुसुम बावकर, दामोदर बावकर, बळीराम बडे, काळूराम माळी, मनोहर माळी, नथुराम पाटील, राजेंद्र बडे, रामचंद्र घासे, नामदेव घासे, दशरथ माळी, वसंत घासे, रामचंद्र घासे, अंकुश ताडकर, विजय बडे, संतोष बडे, नारायण बडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### जिल्ह्यात आज राष्ट्रीय लोक अदालत

**अलिबाग** : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि. ९) राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रायगड–अलिबाग जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड–अलिबाग जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश ए. एस. राजंदेकर यांनी केले आहे.

## गावदेवी गोंधळपाडा संघाने फोडली भाजपची दहीहंडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथकाने अलिबाग तालुका भारतीय जनता पक्ष आणि अलिबाग शहर कमिटीच्या वतीने आयोजित दहीहंडी फोडली. दीड लाखांचे रोख बक्षिस आणि चषक त्यांना देण्यात आला.



भाजपच्या तालुका आणि शहर कमिटीच्या वतीने यंदा स्टेट बँक ऑफ इंडियासमोर भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील ६० गोविंदा पथकांनी सहभाग नोंदविला. ज्यात २१ गोपिका पथकांचाही समावेश होता.

दुपारी ४.३० वाजल्यापासून दहीहंडी उत्सवाला सुरुवात झाली. रात्री १२ वा. च्या सुमारास गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथकाने ही दहीहंडी फोडली. विजेत्या पथकाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर, माजी जिल्हाध्यक्ष महेश मोहीते आणि शहर अध्यक्ष अंकीत बंगेरा यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

या वेळी भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दहीहंडी उत्सवाला आमदार महेंद्र दळवी यांनी हजेरी लावली. आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी या दहीहंडी उत्सवाच्या आयोजनासाठी मार्गदर्शन केले.

## रोह्यात भाजपतर्फे गोपाळकाला उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

शहरातील पारंपारिक दहीहंडी उत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता पक्षानेही या वर्षी प्रथमच दहीहंडीचे आयोजन केले.



शहरातील धनगरआळी, अंधारआळी, मोरेआळी या गोविंदा पथकांस रोहातील छत्रपती संभाजी महाराज चौक (तीनबत्ती नाका) येथे हंडी फोडण्यासाठी नियोजन करण्यात आले होते. अतिशय उत्साहाने मानाची हंडी यावेळी फोडण्यात आली. पथकास रोख रक्कम ११ हजार व चषक यावेळी देण्यात आले.

अष्टमी व दमखाडी या गोविंदा पथकासाठीसुद्धा भाजपच्या वतीने त्यांच्या विभागात हंडी फोडण्यासाठी नियोजन करून रोख रक्कम ११ हजार व चषक देण्यात आला. विविध मराठी मालिकांमध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारी रोहातील संस्कृती संजय शिंदे हिला सन्मानित करण्यात आले. रोहेकरांसाठी वेगवेगळी लोकनृत्याची मेजवानी ठेवण्यात आली होती.

सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकुर, आमदार रवीशेठ पाटील, दक्षिण रायगड संघटक मंत्री सतीश धारप, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने कार्यक्रम यशस्वी पार पडला, तसेच युवानेते रोशन चाफेकर यांच्या प्रवेशाने भाजपला एक वेगळी झळाली मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी दिली.

कार्यक्रमास भाजप तालुका उपाध्यक्ष शैलेश रावकर, युवा नेते प्रकाश साळुंके, जिल्हा महिला मोर्चा सरचिटणीस श्रद्धा घाग, रोहा शहर महिला मोर्चाध्यक्ष ज्योती कुमार, धनश्री बापट, रोहा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष अनिल खंडागळे, जितेंद्र दिवेकर, रायगड जिल्हा विद्यार्थी आघाडी संपर्क प्रमुख वैभव कुळकर्णी, रोहा शहर अध्यक्ष युवा मोर्चा निलेश धुमाळ, ज्येष्ठ कार्यकर्ते वसंत शेलार, शुभम पतंगे, आदर्श गायकवाड, राकेश चाफेकर आदी उपस्थित होते.

## श्रीकृष्ण जन्मोत्सव आणि दहीहंडी उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात १६८ सार्वजनिक तर २९१ खासगी अशा ४५९ दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. गावोगावचे गोविंदा उत्साहात होते.



यंदा दहीहंडीच्या दिवशी सकाळी पाऊस सुरू झाल्याने गोविंदा खुश होते. शाळांना सुटी असल्याने चिमुरड्या गोविंदांनी सकाळपासूनच गोविंदा खेळायला सुरुवात केली. कमी उंचीवरील दहीहंड्या त्यांनी फोडून मनसोक्त धमाल केली.

सकाळपासूनच गावोगावच्या दहीहंड्या गोविंदानी फोडण्यास सुरुवात केले होती. नेरळ शहरात आमदार महेंद्र थोरवे यांनी एक लाख ११ हजार १११ रुपयांची, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे यांनी एक लाख ३१ हजार ३१ रुपयांची, माधवीताई जोशी यांनी एक लाख २१ हजार ९०२ रुपयांची दहीहंडी बांधली.

## शिक्षणाला प्राधान्य देणे म्हणजेच शिक्षकांचा आदर करणे –देवेंद्र साटम

**चौक : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करायचे असल्यास शिक्षक यांचा मानसन्मान राखणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे आणि त्याचबरोबर देशाची सर्व प्रकारची प्रगती शिक्षक यांच्यामुळेच होते, असे प्रतिपादन माजी आमदार देवेंद्र साटम यांनी काढले.



स्व. तात्यासाहेब कापरेकर यांनी आपली आई स्व.उमाबाई उर्फ मामी कापरेकर यांच्या स्मरणार्थ सुरू केलेला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार समारंभ गेली ३८ वर्षे अविरतपणे चालू आहे. कोरोना काळात विजय उर्फ तात्यासाहेब कापरेकर आणि त्यांच्या पत्नी स्व. जयश्री विजय कापरेकर यांचा मृत्यू झाला, परंतु कापरेकर कुटुंबीयांनी या कार्यक्रमाची परंपरा सुरू ठेवून शिक्षणाला प्राधान्य दिल्याचे माजी आमदार देवेंद्र साटम यांनी सांगितले. तात्यासाहेब कापरेकर यांची उणीव कार्यक्रमात प्रखरतेने जाणवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारिणी सभा चौकच्या कार्याध्यक्ष शोभा देशमुख या होत्या, तसेच संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश देशमुख, ग्रामपंचायत सदस्य वृषाली पोळेकर, तात्यांचे सहकारी संतोष ठाकरे, मोहन मुकादम, अविनाश चौधरी, रश्मी कापरेकर, मुख्याध्यापक बोमले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरुडे सर यांनी तर आभार शिक्षक प्रतिनिधी कांबळे सर यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन राजेंद्र विजय कापरेकर यांनी केले होते.

## कारच्या धडकेत महिला ठार; पती जखमी

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई –पुणे द्रुतगती मार्गावर सावरोली टोल नाक्याजवळ स्वीट डिझायर कारने पादचारी दाम्पत्याला धडक दिली. या अपघातात महिलेचा मृत्यू, तर पती गंभीर जखमी झाला आहे.

स्वीट डिझायर कार (एमएच १२ क्यूए २५७)वरील चालक आनंद डोंगरे (वय २९, रा. मालवाडी, फुरसंगी रोड, हवेली पुणे)हा पुणेकडून मुंबईकडे जात असताना त्याने दिलीप घोडके (वय ५९) व त्यांची पत्नी मालन खोपोलीकडे पायी जात असताना त्यांना ठोकर मारली. या घटनेत मालन दिलीप घोडके (वय ५७, रा. अरिहंत हिल, शीळफाटा, खोपोली) यांचा मृत्यू झाला. जखमी दिलीप घोडके यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## हिरवळ महाविद्यालयात दहीहंडी उत्सवाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड व हिरवळ रात्र महाविद्यालय, महाड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यामध्ये सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपला उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. ट्रस्टच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी व महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांनी श्रीकृष्णाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दहीहंडीच्या कार्यक्रमास प्रारंभ केला. विद्यार्थ्यांनी गोविंदाचे रूप परिधान करून वेगवेगळे नृत्य सादर केले, तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्साहात दहीहंडी फोडून या सणाचा मनसोक्त आनंद लुटला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## वैकुंठ पाटील मित्र मंडळाच्या दहीहंडीचे खारपाले पथक मानकरी

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील हमरापूर, जोहे विभागात प्रथमच एक लाख ११ हजार १११ रुपयांची दहीहंडी वैकुंठ रविशेठ पाटील मित्र मंडळाने आयोजित केली होती. या दहीहंडीचा विठाबाई खारपाले या मंडळाच्या पथकाने सात थरांची सलामी लावून मानकरी झाला.



या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, शर्मिला पाटील, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, स्वररंगचे अध्यक्ष राजेंद्र साळवी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रुपेश पाटील, कौशल्या पाटील, सरपंच सतीश पाटील यांनी चषक व रोख रक्कम मंडळाला दिली. आमदार रवीशेठ पाटील, सरपंच परशुराम म्हात्रे, राजेश मोकल, सिने अभिनेत्री श्रद्धा पोद्दार, भरत पाटील, सूर्यहास पाटील, परमेश पाटील, योगेश पाटील, नितीन मोकल, संदेश पाटील, महेश भिकावले, महेश घरत व इतर मान्यवरांनी जोहे तांबटशेत येथे या स्पर्धेला भेट दिली. स्वररंग कला मंचतर्फे नृत्यप्रकार सादर करण्यात आले.

जय हनुमान गोविंदा पथक सोनखार, श्री काळभैरव गोविंदा पथक दादर, रॉयल गोविंदा पथक कळवे, जोहे गोविंदा पथक, म्हसेश्वर गोविंदा पथक रावे, गोविंदा हनुमान गल्ली वाला तांबट शेत, बहिरदेव गोविंदा पथक हनुमान पाडा, गावरे गोविंदा पथक खार सापोली, बिरोबा गोविंदा खारसापोली बेडे, जय जवान गोविंदा कोपर, गावदेवी गोविंदा, भापेश्वर गोविंदा उरणोली, अंतोरे गोविंदा पथकाने, गावदेवी गोविंदा करेगी, या गोविंदा पथकांनीसुद्धा तीन ते चार थराच्या सलामी दिली तर या ठिकाणी बालमित्र गोविंदा पथक गडब, पाचगणी गोविंदा पथक, रुद्रावतार गोविंदा पथक खारपाले, विठाबाई गोविंदा खारपाले, वरदविनायक गोविंदा नवेगाव, उसराई गोविंदा रसायनी, वाघेश्वर गोविंदा पिरकोन, जरीमरी गोविंदा पिरकोन या बाहेरील गोविंदा पथकाने पाच ते सात थर लावून सलामी दिली.

ओम साई महिला गोविंदा कळवे या मुलींनी चार थराची सलामी दिली. या सर्व मंडळांना पाच हजार रुपये सलामीचे बक्षीस वैकुंठ पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

## श्रीवर्धनमध्ये पावसाची जोरदार हजेरी

**श्रीवर्धन : बातमीदार**

जवळ जवळ महिनाभर विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावल्याने तालुक्यात सुखद गारवा जाणवत असल्याचे दिसले. शेतकऱ्यांनीसुद्धा समाधान व्यक्त केले.

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात काही तुरळक पाऊस झाला होता. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारली होती. समुद्र देखील शांत झाला होता, परंतु दहीहंडीच्या मुहूर्तावर पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावलेली आहे. बंगालच्या उपसागरात चक्रीय स्थिती निर्माण झाल्यामुळे पुढील काही दिवस पाऊस पडेल. असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

## खोपोलीत गझलसंग्रहांचे प्रकाशन



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील स्त्रीरोग तज्ज्ञ आणि साहित्यिक डॉ. सुभाष कटकदौंड यांच्या काजवा मनाचा आणि उर्दू साहित्यिक डॉ. सादिका नवाब यांच्या फिर खिले फुल या गझलसंग्रहांचे प्रकाशन कोमसाप खोपोली शाखेच्या अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक उज्वला दिघे यांच्या हस्ते नुकतेच झाले.

या वेळी कोमसापचे उपाध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये, सुधा इतराज, कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डीकर, खजिनदार वामनराव दिघे, सचिव जयश्री पोळ, डॉ. सुभाष कटकदौंड, डॉ. सादिका नवाब आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उज्ज्वला दिघे होत्या. प्रकाश राजोपाध्ये यांनी प्रास्ताविकामध्ये डॉ. कटकदौंड यांच्या पुस्तकातील गजलांची योग्य ती समीक्षा केली. वामनराव दिघे यांनी डॉ. नवाब यांच्या पुस्तकाविषयी माहिती उपस्थितांना सांगितली. त्यानंतर उज्ज्वला दिघे यांनी दोन्ही पुस्तकातील काही गजलांना चाली लावून त्या गायल्या. दोन्ही पुस्तकाचे लेखक डॉ. कटकदौंड व डॉ. नवाब यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नरेंद्र हार्डीकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर जयश्री पोळ यांनी शेवटी आभार मानले.

या वेळी प्राचार्य प्रतापराव पाटील, माजी मुख्याध्यापक सूर्यकांत सरोदे ,कोमसापचे सल्लागार नितीन भावे, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अनिल रानडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष संतोष वाघ, नलिनी पाटील, अनिशा बिवरे, सुप्रिया मेहेंदळे, प्रकाश सोनवणे, जयमाला जांभळे, प्रा. मुळीक, महेश निमणे उपस्थित होते.

# बोपन्नाने रचला इतिहास

## ग्रँडस्लॅम अंतिम फेरी गाठणारा सर्वांत वयस्कर खेळाडू



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

भारताचा अनुभवी टेनिसपटू रोहन बोपन्ना याने ऐतिहासिक कामगिरी करताना अमेरिकन ओपन टेनिस ग्रँडस्लॅम स्पर्धेत पुरुष दुहेरी गटातून अंतिम फेरीत गाठली. ४३ वर्षीय बोपन्ना पुरुष दुहेरी ग्रँडस्लॅम अंतिम फेरीत पोहचणारा सर्वांत वयस्कर खेळाडू ठरला. त्याने ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू एबडेनसह खेळताना विजयी कामगिरी केली.

बोपन्नाने (४३ वर्ष सहा महिने) नवा विश्वविक्रम नोंदवताना कॅनडाचा दिग्गज डॅनिएल नेस्टर (४३ वर्ष चार महिने) याचा विक्रम मोडला. बोपन्ना-एबडेन यांनी पिएरे ह्युजेस हर्बर्ट आणि निकोलस माहुत या फ्रान्सच्या जोडीचा ७-६(७-३), ६-२ असा पराभव केला. विशेष म्हणजे सहा वर्षांनंतर बोपन्नाने पहिल्यांदाच ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. याआधी त्याने २०१७मध्ये फ्रेंच ओपनमध्ये मिश्र दुहेरीत जेतेपद पटकावले होते तसेच त्याने तब्बल १३ वर्षांनी पुरुष दुहेरीच्या ग्रँडस्लॅम स्पर्धेची अंतिम फेरी गाठली.

याआधी २०१०मध्ये बोपन्नाने यूएस ओपनमध्येच उपविजेतेपदावर समाधान मानले होते. त्याने अद्याप पुरुष दुहेरीत एकही ग्रँडस्लॅम पटकावले नसून मिश्र दुहेरीत त्याने कॅनडाच्या गॅब्रिएला डाब्रोवस्कीसोबत फ्रेंच ओपन जेतेपद पटकावले होते.

पहिलीच सर्विस गमावल्याने पिछाडीवर पडलेल्या बोपन्ना-एबडेन यांनी अप्रतिम पुनरागमन करीत पहिला सेट टायब्रेकरमध्ये जिंकला. यानंतर त्यांनी दुसऱ्या सेटमध्ये जबरदस्त आक्रमक खेळ करताना फ्रेंच जोडीला पुनरागमनाची एकही संधी न देता दिमाखात बाजी मारली.

# पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी भारतीय संघ होतोय सज्ज; कसून सराव

**कोलंबो : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी भारतीय संघाने कोलंबो येथील एनसीसीमध्ये इनडोअर सराव सुरू केला आहे. आशिया चषकात भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात रविवारी (दि. १०) सुपर-४ सामना होणार आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आपल्या ट्विटर अकाउंटवर संघाच्या सरावाची छायाचित्रे शेअर केली आहेत. गट फेरीत यापूर्वी भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता. बीसीसीआयने शेअर केलेल्या छायाचित्रांमध्ये कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, के. एल. राहुल, सूर्यकुमार यादव, शार्दुल ठाकूर, शुबमन गिल आणि उपकर्णधार हार्दिक पांड्या दिसत आहेत.

आशिया चषक स्पर्धेमध्ये ग्रुप स्टेजमध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात सामना २ सप्टेंबर रोजी खेळला गेला. यादरम्यान कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण संघाची सुरुवात खूपच खराब झाली होती. शाहीन आफ्रिदीने भारताची टॉप ऑर्डर त्याच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर नेस्तनाबूत केली होती. त्यानंतर इशान किशन (८२) आणि हार्दिक पांड्या (८७) यांनी शानदार खेळी खेळत संघाला ४८.५ षटकांत २६६ या सन्मानजनक धावसंख्येनजीक नेले. त्यानंतर पाऊस सुरू झाला आणि सामना थांबवण्यात आला. पाऊस चालूच राहिल्याने दुसरा डाव न खेळवता सामना रद्द करण्यात आला होता.



### के.एल.राहुलला मिळणार संधी?

टीम इंडियाचा स्टार यष्टीरक्षक फलंदाज के.एल. राहुलला आशिया चषक गट साखळीतील पहिल्या दोन सामन्यात तो पूर्णपणे तंदुरस्त नव्हता. त्यामुळे त्याला प्लेईंग११मध्ये संधी मिळाली नाही, पण सुपर-४मधील पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी तो इनडोअर सराव करताना दिसला. अशा स्थितीत राहुल पाकिस्तानविरुद्धच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये पुनरागमन करू शकतो. पाकिस्तानच्या सामन्यापूर्वी जरी राहुल पूर्णपणे तंदुरुस्त दिसत असला तरी कोणाच्या जागी खेळणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. राहुलची विश्वचषक संघातही निवड झाली आहे.


# अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत आता उपांत्य फेरीचा थरार

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत आता उपांत्य फेरीच्या लढती रंगणार आहेत. पुरुषांमध्ये कार्लोस अल्कराझ विरुद्ध डॅनिल मेदवेदेव आणि नोव्हाक जोकोविच विरुद्ध बेन शेल्टन, तर महिलांमध्ये अरिना सबालेन्का विरुद्ध मॅडिसन कीज आणि कोको गॉफ विरुद्ध कॅरोलिना मुचोव्हा आमनेसामने असतील.

गतविजेत्या व जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या कार्लोस अल्कराझने जर्मनीच्या १२व्या मानांकित अॅलेक्झांडर झ्वेरेव्हला ६-३, ६-२, ६-४ असे पराभूत केले. या विजयामुळे अमेरिकन स्पर्धेत सलग दुसरे जेतेपद मिळवण्याच्या तो जवळ पोहचला आहे. सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करणाऱ्या अल्कराझने झ्वेरेव्हला पुनरागमनाची संधी दिली नाही.

रशियाचा तिसरा मानांकित डॅनिल मेदवेदेवने आपल्याच देशाच्या आंद्रे रुब्लेव्हला पराभूत करीत चौथ्यांदा स्पर्धेची उपांत्य फेरीत गाठली. या सामन्यादरम्यान तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचल्याने दोन्ही खेळाडूंना आव्हानाचा सामना करावा लागला. मेदवेदेवला सामन्यादरम्यान चिकित्सकाची मदतही घ्यावी लागली. तरीही





त्याने रूब्लेव्हला ६-४, ६-३, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवले. पुरुष एकेरीच्या अन्य उपांत्य सामन्यात २३ ग्रँडस्लॅम विजेत्या नोव्हाक जोकोविचपुढे अमेरिकेच्या बेन शेल्टनचे आव्हान असेल. शेल्टन प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या उपांत्य फेरीत खेळणार आहे.

महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व सामन्यात दुसरी मानांकित बेलारूसची अरिना सबालेन्काने चीनच्या २३व्या मानांकित झेंग किनवेनला ६-१, ६-४ अशा फरकाने नमवत सलग पाचव्यांदा उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. दुसरी मानांकित सबालेन्का पुढील आठवड्यात 'डब्ल्यूटीए' क्रमवारीत इगा श्वीऑनटेकला मागे टाकून जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी पोहचेल. उपांत्य फेरीत सबालेन्काचा सामना अमेरिकेच्यरा मॅडिसन कीजशी होणार आहे. कीजने विम्बल्डन विजेत्या मार्केटा वोंड्रोउसोव्हावर ६-१, ६-४ असा विजय नोंदवला. महिला गटातील अन्य उपांत्य सामन्यात सहाव्या मानांकित अमेरिकेच्या कोको गॉफसमोर १०व्या मानांकित कॅरोलिना मुचोव्हाचे आव्हान असेल.

# सीपीएलमध्ये निकोलस पूरनचे वादळी शतक

**पोर्ट ऑफ स्पेन : वृत्तसंस्था**

कॅरेबियन प्रीमियर लीगच्या २०व्या सामन्यात शाहरूख खानच्या त्रिनबागो नाइट रायडर्सने बार्बाडोस रॉयल्सचा ४२ धावांनी पराभव केला. नाइट रायडर्सच्या या विजयात त्यांचा यष्टिरक्षक फलंदाज निकोलस पूरनने महत्त्वाची भूमिका बजावली. निकोलसने पाच चौकार आणि १० षटकारांच्या मदतीने ५३ चेंडूंत नाबाद १०२ धावांची खेळी केली. निकोलस हा काव्या मारनच्या इंडियन प्रीमियर लीग २०२२मध्ये सनरायझर्स हैदराबाद या फ्रेंचायझीचा भाग होती. सध्या लखनौ सुपर जायंट्सचा एक भाग आहे.



निकोलस पूरनच्या खेळीच्या जोरावर प्रथम फलंदाजी करताना त्रिनबागो नाइट रायडर्स संघाने ६ बाद २०८ धावा केल्या. सलामीवीर मार्टिन गप्टिलने ३० चेंडूंत ३८ धावा केल्या, तर अष्टपैलू आंद्रे रसेलने २२ चेंडूंत ३९ धावांची खेळी केली. लक्ष्याचा पाठलाग करताना बार्बाडोस रॉयल्सला २० षटकांत ७ बाद १६६ धावा करता आल्या. त्रिनबागो नाईट रायडर्सच्या अक्कील हुसैन आणि वकार सलामखिल यांनी अनुक्रमे २१ आणि १८ धावांत प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अली खान, आंद्रे रसेल आणि सुनील यांनाही प्रत्येकी एक विकेट घेण्यात यश आले.

बार्बाडोस रॉयल्सकडून सलामीवीर कायल मेयर्सने ४५ चेंडूंत ७० धावा केल्या. त्यात सात चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता, मात्र त्याला दुसऱ्या टोकाकडून साथ न मिळाल्याने त्याचे प्रयत्न व्यर्थ गेले. बार्बाडोस रॉयल्सचे पाच फलंदाज एकेरी धावसंख्येत माघारी परतले. अष्टपैलू जेसन होल्डरने १९ आणि रोएलॉफ व्हॅन डर मर्वेने २० धावा केल्या.

सीपीएल २०२३मध्ये त्रिनबागो नाइट रायडर्सचा सात सामन्यांमधला हा चौथा विजय आहे. त्यांचे नऊ गुण झाले असून ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

# फुटबॉल बॅलन डी'ओर पुरस्काराची नामांकन यादी जाहीर

## मेस्सी, हालँडचा समावेश; रोनाल्डोला वगळले



**पॅरिस : वृत्तसंस्था**

विश्वविजेत्या अर्जेटिना फुटबॉल संघाचा कर्णधार आणि तारांकित आघाडीपटू लिओनेल मेस्सीला प्रतिष्ठेच्या बॅलन डी'ओर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. यापूर्वी विक्रमी सात वेळा मेस्सी या पुरस्काराचा मानकरी ठरला आहे. दशकभराहून अधिक कालावधीपासून मेस्सीचा प्रतिस्पर्धी असलेल्या ख्रिस्तियानो रोनाल्डोला मात्र ३० जणांच्या नामांकन यादीत स्थान मिळालेले नाही.

गतवर्षी कतार येथे झालेल्या 'फिफा' विश्वचषकात मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेटिनाचा संघ विजेता ठरला होता. मेस्सीने या स्पर्धेत सात गोल आणि तीन गोलसाहाय्य (असिस्ट) नोंदवले होते. फ्रान्सविरुद्ध अंतिम सामन्यात त्याने दोन गोल केले होते. त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूला मिळणारा 'गोल्डन बॉल' मिळाला होता. त्यामुळे सध्या अमेरिकेतील मेजर लीग सॉकरमध्ये इंटर मियामीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मेस्सीला बॅलन डी'ओर पुरस्कारासाठी प्रमुख दावेदार मानले जात आहे.

एम्बापेचा समावेश असलेल्या फ्रान्स संघाला विश्वचषकात उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. त्याने अर्जेंटिनाविरुद्ध अंतिम सामन्यात हॅट्ट्रिक नोंदवताना फ्रान्सला सामना एकहाती जिंकवून देण्याचा प्रयत्न केला होता, पण अखेरीस फ्रान्सला पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव पत्करावा लागला. एम्बापेने या स्पर्धेत एकूण आठ गोल आणि दोन गोलसाहाय्य केले होते. तसेच त्याने पॅरिस सेंट-जर्मेनसाठी सर्व स्पर्धात मिळून ४३ सामन्यांत ४१ गोल केले होते.

पाच वेळचा बॅलन डी'ओर विजेता रोनाल्डोला २००३ नंतर प्रथमच या पुरस्कारासाठी नामांकनही मिळाले नाही. रोनाल्डोला गेल्या हंगामात लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. तो सध्या सौदी अरेबियातील अल-नासर क्लबसाठी खेळत आहे.

महिलांमध्ये ऐताना बोनामतीसह स्पेनच्या सहा खेळाडूंना नामांकन मिळाले आहे. स्पेनने गेल्या महिन्यात महिला विश्वचषकाचे जेतेपद पटकावले होते. बॅलन डी'ओरच्या विजेत्यांची घोषणा ३० ऑक्टोबर रोजी करण्यात येईल.

# आयएसएलमध्ये केरळ आणि बंगळुरू संघांत सलामीची लढत

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन सुपर लीग २०२३-२४ फुटबॉलचे वेळापत्रक जाहीर झाले असून २१ सप्टेंबरपासून आयएसएलच्या १०व्या पर्वाला सुरुवात होणार आहे. केरळा ब्लास्टर्स विरुद्ध बंगळुरू एफसी यांच्यात सलामीचा सामना कोची येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर होणार आहे.

आयएसएलचे हे दहावे पर्व आहे आणि आयएसएल ही डिजिटल आणि लिनियर टीव्ही प्लॅटफॉर्मवर भारतातील सर्वोच्च फुटबॉल लीग आहे. आयएसएलच्या पहिल्या टप्प्यातील वेळापत्रकच जाहीर करण्यात आले आहे आणि यात भारत-पाकिस्तान यांच्यात वन डे वर्ल्डकप स्पर्धेत होणाऱ्या सामन्यामध्ये क्लॅश होऊ नये याची काळजी घेतली गेली आहे.

या वेळी वायाकॉम१८ने आयएसएलच्या थेट प्रक्षेपणाचे हक्क जिंकले असून जिओ सिनेमावरदेखील ते विनामूल्य प्रसारित केले जातील. यानंतर २३ ऑक्टोबरपासून आशियाई स्पर्धा होणार असून यात भारताचा फुटबॉल संघही या वेळी सहभाग घेणार आहे.

# किंग्स कप फुटबॉल स्पर्धेत पंचांनी हिरावला भारताचा विजय

**चियांग माई (थायलंड) : वृत्तसंस्था**

किंग्स कप फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील सामन्यात इराकने रोमहर्षक सामन्यात भारतावर २-२ ( ५-४) असा पेनल्टी शूटआऊटमध्ये विजय मिळवला. भारताला किंग्स कपच्या फायनलमध्ये प्रथमच धडक देण्याची संधी होती अन् त्यांनी आघाडीही घेतली होती, मात्र दोन्ही वेळेस इराकला पेनल्टी किक मिळाली अन् त्यांनी निर्धारित वेळेत सामना २-२ असा बरोबरीत सोडवला. पेनल्टी शूटआऊटमध्ये मात्र भारताला हार मानावी लागली. निर्धारित वेळेत इराकला मिळालेले दोन्ही पेनल्टी या वादात अडकल्या आहेत. रेफरीने भारतीय संघावर अन्याय केल्याची चर्चा आहे.

भारत-इराक यांच्यात पहिल्या हाफमध्ये १-१ अशी बरोबरी होती. त्यानंतर महेश नाओरेम सिंगने १६व्या मिनिटाला आघाडी मिळवून दिली, तर २८व्या मिनिटाला पेन करिमने इराकसाठी बरोबरीचा गोल केला. दुसऱ्या हाफमध्ये आकाश मिश्राने मारलेला चेंडू इराकचा गोलरक्षक जला हसनने रोखला, परंतु त्यावर नियंत्रण राखण्यात तो अपयशी ठरला. चेंडू गोलजाळीत विसावला आणि भारताला २-१ अशी



आघाडी मिळाली. ७२व्या मिनिटाला गुरप्रीत सिंग संधूने अप्रतिम बचाव करून इराकला पुन्हा बरोबरी मिळवू दिली नाही. भारताचा बचावही भक्कम होता आणि त्यांनी इराकचे प्रयत्न हाणून पाडले होते.

८०व्या मिनिटाला इराकला पेनल्टी मिळाली. निखिल पुजारी आणि संदेश झिंगान यांनी इराकच्या खेळाडू पेनल्टी क्षेत्रात पाडले. आयमन हुसेनने इराकसाठी बरोबरीचा गोल केला. ८४व्या मिनिटाला हुसेन तिसऱ्या गोलच्या अगदी जवळ पोहचला होता, परंतु त्याचा हेडर चुकला अन् गुरप्रीतने चांगला बचाव केला. त्यामुळे हलबल झालेल्या इराकच्या खेळाडूने ९०+३ मि. राग काढला. इक्बालने भारताच्या फर्नांडेसच्या चेहऱ्यावर कोपरा मारला अन् रेफरीने लगेच त्याला रेड कार्ड देऊन बाहेर केले. निर्धारित वेळेत २-२ अशा बरोबरीमुळे सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला.

### पेनल्टी शूटआऊटमध्ये इराकची सरशी

पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताच्या ब्रेंडन फर्नांडेसचा पहिला गोल पोस्टला लागून अयशस्वी ठरला. दुसरीकडे इराकच्या मेर्चास डोस्कीने गोल करून आघाडी घेतली. त्यानंतर संदेशन झिंगनने चतुराईने गोल करून भारताचे खाते उघडले. मग अली अदनानने सहज गोल करून इराकची आघाडी २-१ अशी मजबूत केली. पुढे भारताच्या सुरेश वांगजामने गोल केला अन् सामना २-२ असा बरोबरीत आला. आयमन हुसेनने गुरप्रीतला चकवले अन् इराकला पुन्हा ३-२ अशा आघाडीवर आणले. भारताकडून अन्वर अलीने गोल केला, तर अल हमावीने इराकला ४-३ असे पुढे नेले. रहिम अलीने ४-४ अशी भारताला बरोबरी मिळवू दिली. आता गुरप्रीतवर सर्व मदार होती, पण इराकच्या बाशर रसान बोन्याननने गोल करून इराकचा २-२ (५-४) असा विजय पक्का केला.

# धोनीने लुटला गोल्फ खेळण्याचा आनंद

**व्हिडीओ व्हायरल**



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी सध्या अमेरिकेत आहे, जिथे तो यूएस ओपन पुरुष एकेरीचा उपांत्यपूर्व सामना पाहण्यासाठी आला होता. धोनीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असताना माहीचा आणखी एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये तो अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत गोल्फ खेळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार महेंद्रसिंह धोनी आणि डोनाल्ड ट्रम्प हे दोघे नॅशनल गोल्फ क्लब बेडमिन्स्टरमध्ये गोल्फ खेळले. दुबईस्थित उद्योगपती हितेश सांघवीच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून धोनीचा एक फोटो पोस्ट करण्यात आला आहे, ज्यामध्ये तो डोनाल्ड ट्रम्पसोबत गोल्फ खेळताना दिसत आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com